# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ०५ एप्रिल २०२५ | वर्ष तिसरे | अंक ०४ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## वक्फ दुरुस्ती विधेयक वंचितांना मदत ठरेल : पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली : संसदेच्या दोन्ही सभागृहात वक्फ दुरुस्ती विधेयक बहुमताने मंजूर झाले. यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विटरवर (एक्स) प्रतिक्रिया दिली आहेत. हे विधेयक दीर्घकाळापासून सामाजिकदृष्ट्या दुर्लक्षित, ज्यांचा आवाज आणि संधी दोन्ही नाकारल्या जाणाऱ्या लोकांना मदत करेल, असेदेखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.



तब्बल १२ तासांच्या वादळी चर्चेनंतर गुरुवारी मध्यरात्रीनंतर २.३० वाजता वक्फ दुरुस्ती विधेयक राज्यसभेत बहुमताने मंजूर झाले. विधेयकाच्या बाजूने १२८ तर विरोधात ९५ सदस्यांनी मतदान केले. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या सर्व सूचना फेटाळण्यात आल्या.

दरम्यान, बुधवारी लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयकाला मंजुरी मिळाली होती. आता राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर त्याचे कायद्यात रूपांतर होईल.

यासंदर्भात पंतप्रधान म्हणाले की, आपण आता अशा युगात प्रवेश करणार आहोत जिथे चौकट अधिक आधुनिक आणि सामाजिक न्यायासाठी संवेदनशील असेल. मोठ्या प्रमाणात, प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेला प्राधान्य देण्यास आपण वचनबद्ध आहोत. अशाप्रकारे आपण एक मजबूत, अधिक समावेशक आणि अधिक दयाळू भारत निर्माण करत असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

संसदेच्या दोन्ही सभागृहांनी वक्फ (दुरुस्ती) विधेयक मंजूर केल्याने सामाजिक-आर्थिक न्याय, पारदर्शकता आणि समावेशक विकासाच्या आपल्या सामूहिक प्रयत्नात एक महत्त्वाचा क्षण आहे. गेल्या अनेक दशकांपासून वक्फ व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणि जबाबदारीचा अभाव होता. यामुळे विशेषतः मुस्लिम महिला, गरीब मुस्लिमांच्या हिताचे नुकसान झाले. संसदेने मंजूर केलेले कायदे पारदर्शकता वाढवतील आणि लोकांच्या हक्कांचे रक्षण करतील, असेदेखील पंतप्रधानांनी नमूद केले आहे.

## छत्रपती शिवरायांबद्दल अपमानजनक वक्तव्य करणाऱ्यांविरोधात आणणार कायदा

सातारा : गेल्या काही दिवसापासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबतीत अवमानजनक वक्तव्य केल्याची प्रकरणे समोर आली होती. यावर आता कायदा होणार असल्याची माहिती उदयनराजे भोसले यांनी दिली. या कायद्याची घोषणा स्वत: केंद्रीय मंत्री अमित शाह रायगडावरुन येऊन करणार असल्याची माहिती खासदार भोसले यांनी दिली. काही दिवसापूर्वी अमित शाह यांची भेट घेऊन या कायद्याची मागणी खासदार भोसले यांनी केली होती. खासदार उदयनराजे भोसले म्हणाले की, या महिन्यात १२ तारखेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त किल्ले रायगडावर गृहमंत्री अमित शहा आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या माध्यमातून घोषणा होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्यांविरोधात मी जी इच्छा व्यक्त केली होती, त्या कायद्याची घोषणा झाली तर याला वेगळे महत्व प्राप्त होईल, असंही उदयनराजे भोसले म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबतीत प्रशांत कोरटकर यांनी विधान केले होते. या प्रकरणी राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. महापुरुषांचा अवमान आणि इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना धमकावणे, या प्रकरणातील नागपुरातील आरोपी प्रशांत कोरटकर याचे वकील सौरभ घाग यांनी गुरुवारी जिल्हा व सत्र न्यायालयात जामिनासाठी अपील अर्ज केला. यावर उद्या, शनिवारी किंवा सोमवारी दोन्ही बाजूंच्या वकिलांकडून युक्तिवाद होण्याची शक्यता आहे. चौथे सहदिवाणी न्यायाधीश एस. एस. तट यांनी मंगळवारी कोरटकर याचा जामीन अर्ज नामंजूर केला होता. त्यामुळे कोरटकर याचा मुक्काम कळंबा कारागृहात वाढला आहे. नवीन अर्जावर सरकारी वकील, पोलिस विभागातील तपास अधिकारी, फिर्यादी इंद्रजित सावंत यांचे म्हणणे घेतले जाणार आहे. त्यानंतर जामीनवर निर्णय होणार आहे.

## वक्फ विधेयकाला काँग्रेस सुप्रीम कोर्टात आव्हान देणार

### जयराम रमेश यांची पत्रकार परिषदेत माहिती

नवी दिल्ली : मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड आणि द्रविड मुणेद्र कडघम (डीएमके) यांच्या मांदियाळीत आता काँग्रेसही जावून बसली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहात बहुमताने मंजुर झालेल्या वक्फ दुरुस्ती विधेयकाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची तयारी काँग्रेसने चालवली असून काँग्रेस सरचिटणीस जयराम रमेश यांनी ट्विटरवर (एक्स) संदेश जारी करत याबाबत सुतोवाच केले आहे.



यापूर्वी मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड आणि डीएमकेचे प्रमुख एम.के. स्टॅलिन यांनी वक्फ विधेयकाबाबत न्यायालयात जाण्याची घोषणा केली होती. मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने २ एप्रिल रोजी विधेयकाच्या विरोधात आंदोलन करण्याच्या आणि कोर्टात जाण्याचा इशारा दिला होता. तर द्रमुक नेते स्टॅलिन यांनी गुरुवारी सांगितले होते की, त्यांचा पक्ष या विधेयकाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करेल.

लोकसभेत विधेयक मंजूर झाल्याच्या निषेधार्थ स्टॅलिन काळी पट्टी घालून विधानसभेत पोहोचले. भारतातील मोठ्या संख्येने पक्षांच्या विरोधाला न जुमानता काही मित्रपक्षांच्या आदेशानुसार रात्री २ वाजता घटनादुरुस्ती स्वीकारणे हा संविधानाच्या रचनेवर हल्ला आहे. यापार्श्वभूमीवर सोशल मिडीयात केलेल्या पोस्टमध्ये जयराम रमेश म्हणाले की, काँग्रेस लवकरच वक्फ (दुरुस्ती) विधेयक, २०२४ च्या घटनात्मक वैधतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देईल. आम्हाला पूर्ण विश्वास आहे. भारतीय संविधानात नमूद केलेल्या तत्त्वांवर, तरतुदींवर आणि पद्धतींवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारकडून होणाऱ्या सर्व हल्ल्यांना आम्ही विरोध करत राहू असे जयराम रमेश यांनी सांगितले.

काँग्रेसने यापूर्वी सीएएला कायद्याला आव्हान दिले असून त्यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. तसेच माहिती अधिकार कायद्यातील २०१९ च्या सुधारणांना काँग्रेसने आव्हान दिले आहे. निवडणूक आचार नियमातील (२०२४) सुधारणांच्या वैधतेला काँग्रेसने आव्हान दिले आहे यावरही सुनावणी सुरू आहे. त्याचप्रमाणे, १९९१ च्या (प्लेसेस ऑफ वर्शिप ॲक्ट) प्रार्थनास्थळ कायद्याची मूळ भावना राखण्यासाठी काँग्रेसने केलेल्या हस्तक्षेपावर सर्वोच्च न्यायालयात एक खटला प्रलंबित आहे.

## लंडनहून मुंबईला येणारे विमान तुर्की विमानतळावर दोन दिवसापासून अडकले; २५० हून अधिक प्रवासी

अंकारा : भारतीयांसह २५० हून अधिक व्हर्जिन अटलांटिक विमान कंपनीचे प्रवासी तुर्कीमधील विमानतळावर ४० तासांपेक्षा जास्त काळ अडकून पडले आहेत. लंडनहून मुंबईला येणारे विमान दियारबाकीर विमानतळाच्या दिशेने वळवण्यात आले होते. लंडन हिथ्रो येथून मुंबईला जाणारे विमान परतण्याची शक्यता आहे. व्हर्जिन अटलांटिकने दिलेल्या माहितीनुसार, प्रवाशांना मुंबईला नेण्यासाठी पर्यायी फ्लाइटची व्यवस्था करण्यासह सर्व पर्यायांचा विचार केला जात आहे.

लंडन-मुंबई व्हर्जिन अटलांटिक विमानातील २५० हून अधिक प्रवाशांना दोन दिवसांपासून अडचणींचा सामना करावा लागत आहे. यातील बहुतांश भारतीय आहेत. सर्व प्रवासी तुर्कीतील दियारबाकीर विमानतळावर ४० तासांपेक्षा जास्त काळ अडकून पडले आहेत. २ एप्रिल रोजी लंडनहून मुंबईला जाणारे VS358 हे विमान आपत्कालीन परिस्थितीमुळे दियारबाकीर विमानतळावर उतरवण्यात आले. मात्र, लँडिंग केल्यानंतर विमानात तांत्रिक बिघाड निर्माण झाला. मात्र त्यानंतर प्रवाशांची मुंबईला परतण्याबाबत कोणतीही सुविधा करण्यात आली नव्हती. विमानातल्या बिघाडानंतर क्रूला हॉटेलमध्ये नेण्यात आले तर प्रवाशांना छोट्या प्रादेशिक विमानतळामधील भागात थांबवण्यात आले. मात्र तिथे पुरेशा सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना दोन दिवसांपासून मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. भारतीय दूतावासाच्या मदतीनंतर काही प्रवाशांना जवळच्या हॉटेलमध्ये नेण्यात आले आहे. स्थानिक वेळेनुसार सकाळी ९ वाजेपर्यंत परतीच्या प्रवासासाठी दुसरे विमान तयार होईल, असे एअरलाइनने सांगितले होते. मात्र काही प्रवासी अजूनही विमानतळ ट्रान्झिट होल्डिंग एरियामध्ये आहेत. अडकलेल्या प्रवाशांपैकी एकाने सांगितले की, त्यांना जमिनीवर बसण्यास भाग पाडले गेले. त्यांना ब्लँकेटही देण्यात आले नाही. याशिवाय, शाकाहारी जेवण उपलब्ध नाही, असे एका प्रवाशाने सांगितले.

## ट्रॅक्टर विहीरीत कोसळून ८ महिलांचा मृत्यू, ७ मृतदेह बाहेर काढण्यात यश


### मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाखांची मदत

तभा वृत्तसेवा

हिंगोली, ४ एप्रिल

वसमत तालुक्यातील गुंज येथून नांदेड येथील आलेगावात हळद काढणीच्या कामासाठी ट्रॅक्टरने जातांना ट्रॅक्टर चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर विहीरीत पडले. या ट्रॅक्टरमधील महिला आणि पुरूषही विहीरीत पडले. या दुर्दैवी अपघातात ८ महिलांचा मृत्यू झाला असून दोन महिला व एका पुरूषाला वाचविण्यात गावकर्यांना यश आले. घटनेची माहीती मिळताच हिंगोली व नांदेड येथील पोलिस, महसुल प्रशासनाच्यावतीने क्रेनच्या सहाय्याने विहीरीत पडलेले ट्रॅक्टर आणि सात मृतदेह विहीरीच्या बाहेर काढण्यात प्रशासनाला यश आले आहे. घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाखांचे अर्थसहाय्य देण्याची घोषणा करण्यात आली आहे.





वसमत तालुक्यातील गुंज गावातील १० महिला आणि एक पुरूष हळद काढणीच्या कामासाठी गुंज शिवारालगत आलेगाव जि नांदेड दगडू शिंदे यांच्या शेतात ट्रॅक्टरमधून नेत असतांना हा अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर विहीरीत कोसळल्याची माहीती आहे. यातील दोन महिला व एका पुरूषाला बचावले आहे. विहीरीत पाणी आणि गाळ असल्यामुळे ट्रॅक्टर पूर्णपणे पाण्यात बुडाला आहे. या अपघातात चोतराबाई माधव पारधे, सिमरन संतोष कांबळे, सपना राजू राऊत, ज्योती इरबाजी सरोदे, सरस्वती लखन बुरूड, ताराबाई सटवा जाधव, धुरपता सटवा जाधव या महिलांचा मृत्यू झाला आहे तर या अपघातातील पुरबाबाई संतोष कांबळे, पर्वताबाई रामा बुरूड, सटवा जाधव यांना विहीरीतून सुखरूप बाहेर काढण्यात ग्रामस्थ आणि पोलिसांना यश आले आहे. तीन विद्युत पंपाच्या सहाय्याने विहीरीतील पाणी उपसा करून सात महिलांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. सकाळी आठ वाजल्यापासून ते दुपारी दोन वाजेपर्यंत मदत व बचाव कार्य सुरू होते. घटनास्थळी गुंज, आलेगाव तसेच परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. बाहेर काढण्यात आलेल्या मृतदेहापैकी चार मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी वसमतच्या उपजिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले तर दोन मृतदेह नांदेड जिल्ह्यातील निळा प्राथमिक आरोग्य केंद्रात तर एक मृतदेह नांदेड जिल्ह्यातील लिंबगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आला आहे.

वसमत विधानसभेचे आ. राजु नवघरे, आ, बालाजी कल्याणकर यांनी घटनास्थळी भेट दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घटनेची माहीती दिली. त्यानंतर फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येक ५लाख रूपयांचे आर्थिक सहाय्य देण्याचे जाहीर केले. तसेच सदर घटना अत्यंत दुर्दैवी असून मयतांच्या कुटुबीयांप्रती संवेदना व्यक्त केली. यावेळी गुंज गावातील ग्रामस्थ तसेच मृतांचे नातेवाईक यांचा आक्रोश ऐकायला येत होता.

## हैदराबादमध्ये मुसळधार पाऊस : दोन शेतकऱ्यांचा मृत्यू, चारमिनारचे नुकसान, पाणी तुंबल्याने वाहतूक ठप्प

हैदराबाद : हैदराबाद आणि तेलंगणातील इतर भागांत कालपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने नागरिकांना उन्हाच्या तीव्रतेपासून दिलासा दिला असला, तरी त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील काही दिवसांत हैदराबाद आणि परिसरात जोरदार पावसासह वादळी वाऱ्यांची शक्यता वर्तवली आहे.

हैदराबादमधील काही भागांमध्ये पाणी तुंबल्याने रस्ते जलमय झाले असून, वाहने पाण्यात अडकलेली दिसून येत आहेत. अनेक ठिकाणी नागरिक गुडघाभर पाण्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करत असल्याचे दृश्य सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे.

अतिवृष्टीची प्रमुख ठिकाणे

अलवाल, बंजारा हिल्स, बेगमपेट, ईसीआयएल क्रॉस रोड्स, हब्सीगुडा, जुबिली हिल्स, काप्रा, कारखाना, मसाब टँक, पॅराडाईज, पंजागुट्टा, सैनिकपुरी, तारनाका आणि त्रिमुलघेरी या भागांमध्ये जोरदार पाऊस झाला आहे.

शेतकऱ्यांचा मृत्यू आणि चारमिनारचे नुकसान

नागरकुरनूल जिल्ह्यात शेतात काम करत असताना वीज कोसळून दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. गजुला एराम्मा (वय ६०) आणि सैदम्मा (वय ४५) असे मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांची नावे आहेत. पोलिसांनी त्यांचे मृतदेह पोस्टमार्टेम नंतर त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात दिले.

दरम्यान, हैदराबादच्या ऐतिहासिक चारमिनारच्या ईशान्य मिनारला पावसामुळे तडे गेले असल्याची माहिती सियासत डेलीने दिली आहे.

वाहतूक कोंडी आणि प्रशासनाची कारवाई

हैदराबाद वाहतूक पोलिसांच्या माहितीनुसार, मलकापेट रेल्वे

## विज पडून चार जनावरे दगावली

पूर्णा, प्रतिनिधी - पूर्णा तालुक्यात गुरुवार रोजी रात्री साडेआठच्या सुमारास वादळी वाऱ्यासह विजेचा कडकडाट पाऊस झाल्यामुळे तालुक्यात चार जनावरे दगावली असून शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पूर्णा तालुक्यात गुरुवारी रात्री आठ ते साडेआठच्या सुमारास वादळी वाऱ्यासह अर्धा तास पाऊस झाल्यामुळे शेतातील पिकाचे मोठे नुकसान झाले असून पूर्णा तालुक्यातील माहेर येथील दत्तराव माणिकराव पौळ यांचा एक बैल तर गोविंदपुर येथील गणपत मुंजाजी देसाई यांची एक म्हैस तसेच धानोऱ्या मोत्या येथील नितीन मुंजाजी मोहिते यांचा एक बैल तर दगडवाडी येथील लक्ष्मण परसराम वाघमारे यांचा एक बैल अशी चार जनावरे विज पडून दगावल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी संबंधित गावचे तलाठी घटनास्थळी दाखल झाले असून त्या ठिकाणी पंचनामा करण्यात आला आहे याबाबतची माहिती तहसील कार्यालयात संबंधित तलाठी यांनी दाखल केली आहे.या वादळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेतातील पिकाचे नुकसान झाले आहे.

## अवकाळीचा शेतकऱ्यांना मोठा फटका; आंबा, द्राक्ष, डाळींब, कांदा, भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान


नाशिक : जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे सटाणा, कळवण, दिंडोरी, नाशिक या चार तालुक्यांना चांगलेच झोडपले. अवकाळीमुळे कांदा, द्राक्षे, भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. जिल्हा प्रशासनाला प्राप्त झालेल्या प्राथमिक अहवालानुसार जिल्ह्यात १२९७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून यात ११७५ हेक्टर क्षेत्रावरील कांदा पिकाचा समावेश आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या १९९० आहे.

हवामान विभागाने पावसाचा अंदाज वर्तविल्याने शेतकऱ्यांनी कांदा काढणीस लगबगीने सुरूवात केली होती. मात्र, काढून ठेवलेला कांदा शेतातच झाकून ठेवल्याने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. तसेच काढणी योग्य कांद्याचे देखील नुकसान झाले आहे. यात सर्वाधिक नुकसान सटाणा तालुक्यात झाले असून तालुक्यात ११०० क्टरवरील कांदा पिकाचे नुकसान झाले. ५० हेक्टरवरील भाजीपाला, १५ हेक्टरवरील डाळिंब अशा एकूण ११५५ हेक्टरवरील पिकांना फटका बसला आहे. या पावसामध्ये पीका नुसार कांदा - ११७५, द्राक्ष -१९.८० भाजीपाला - ६०.६०, गहू - १०, टोमॅटो १०, डाळींब -१९.६०, इतर २, हेक्टर क्षेत्रावर नुकसान झाले आहे.

तालुक्यातील औंदाणे, कौतिकपाडे, बिजोठे, आखतवाडे, निताणे, पारनेर, जायखेडा, नांदीन, दरेगाव, तांदूळवाडी, मोसम आरम परिसरात गारांचा पाऊस झाल्याने तालुक्यातील १७०० शेतकऱ्यांना याचा फटका बसला. दिंडोरी तालुक्यातही पावसाने हजेरी लावली. पावसाचा कांदा, द्राक्षे, गहू, हरभरा आदी पिकांना फटका बसला प्राथमिक अहवालानुसार ८ हेक्टरवरील कांदा, ५.८० हेक्टरवरील द्राक्षे अशा एकूण १५ हेक्टरवरील पिकांची नासाडी झाली. कळवण तालुक्यात ५५ हेक्टरवरील कांदा, १० हेक्टरवरील भाजीपाला व १० हेक्टर क्षेत्रावरील टोमॅटो पिकाचे नुकसान झाले आहे.

बार्शीत अवकाळीचा शेतकऱ्यांना फटका

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील पांगरी, मळेगाव, हिंगणी, बोरगाव, झाडी, उपळे, महागाव, पिंपळगाव, जामगाव, कापशी परिसरात वादळ आणि विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस झाला. जवळपास अर्धा तास कोसळलेल्या या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. कांदा पिकांसह ज्वारी, गहू, हरभरा, आंबा, द्राक्ष या पिकांना मोठा फटका बसला आहे. या अवकाळी पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असला तरी शेतकऱ्यांमध्ये मात्र चिंता वाढली आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ‘जागृती’स मंत्री तिम्मापूर यांची सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -**
मांजरा साखर परिवारातील सदस्य असलेला देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजला कर्नाटक राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री आर. बी. तिम्मापूर यांनी सदिच्छा भेट देऊन तेथील सुरू असलेल्या शुगर प्लान्ट, आसवनी, गाळप, मशीनरी, साखर उत्पादन व प्रशासकीय कामांची पाहणी केली. येथे सुरू असलेल्या सर्व युनिटचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी बेंगलोर येथील शुगर टेक्निकल कन्सलटंट बसवराज सज्जन, कर्नाटकातील हिंदुस्तान शुगरचे कार्यकारी संचालक राजेंद्र इंगळे, तसेच कर्नाटक सरकारमधील उच्चपदस्थ अधिकारी, जागृती शुगरचे जनरल मॅनेजर गणेश येवले, रामानंद कदम, अतुल देरेकर, विलास पाटील, ज्ञानेश्वर जाधव, अक्षय सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

प्रारंभी मंत्री तिम्मापूर यांचे



कारखान्याच्यावतीने जनरल मॅनेजर येवले यांनी शाल, श्रीफळ देऊन स्वागत केले. महाराष्ट्र-कर्नाटक-तेलंगणा सीमेवर असलेल्या व महाराष्ट्रात खासगी साखर उद्योगात शेतकऱ्यांना ‘एफआरपी’पेक्षा अधिक भाव देणाऱ्या, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या जागृती साखर कारखान्यात जी नवीन टेक्नॉलॉजीवर विविध चालणारे प्रकल्प अतिशय चांगले आहेत, असे सांगून त्यांनी ‘जागृती’चे संचालक व प्रशासनाचे त्यांनी कौतुक केले. भविष्यात कर्नाटक राज्यात आम्हाला जागृती शुगर कारखान्याच्या धर्तीवर प्रकल्प सुरू करण्यासाठी निश्चित उपयोग होईल, असे ते म्हणाले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## प्रकाश नगरातील श्री दत्त मंदिरात सप्ताह सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -**
येथील प्रकाश नगर परिसरातील श्री दत्त मंदिरमध्ये अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित केला आहे. सप्ताहास बुधवारपासून प्रारंभझाला. सांगता सोहळा ९ एप्रिल रोजी होणार आहे.

व्यासपीठाचार्य हभप चंद्रसेन महाराज सोमवंशी-धानोरकर यांच्या उपस्थितीत बुधवारी कलश पूजन, ज्ञानेश्वरी पूजन, गाथा पूजन, टाळ पूजन, मृदंग पूजन, विणा पूजन, व्यासपीठ पूजन असे कार्यक्रम झाले. सप्ताहकाळात काकडा भजन, श्री विष्णूसहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, महिला भजन, हरिपाठ, हरिकीर्तन, हरिजागर, असे कार्यक्रम पार पडणार आहेत. ८ एप्रिल रोजी सकाळी सात वाजता ग्रंथदिंडी मिरवणूक सोहळा होणार आहे. ९ एप्रिल रोजी सकाळी ९ ते १२ दरम्यान, हभप दिनेश महाराज भुसणीकर यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने सप्ताहाचा समारोप होणार आहे.

## यशवंत नागरी बँकेला १.१५ कोटीचा नफा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -**
येथील यशवंत नागरी सहकारी बँकेने मार्च २०२५ अखेर १०७ कोटींचे एकत्रित व्यवसायाचे लक्ष्य साध्य केले असून एकूण ठेवी ६७ कोटी, १२ लाख आहेत. कर्ज ४१ कोटी, ९१ लाख असून भागभांडवल २ कोटी, ८७ लाखाचे व राखीव निधी ४ कोटी, ७९ लाख इतका आहे. निव्वळ नफा १ कोटी १५ लाख झाला असल्याची माहिती बँकेचे चेअरमन सुहास पाचपुते यांनी दिली.
बँकेस मिळालेला नफा व ग्रॉस एनपीए २.२३ टक्के असून नेट एनपीए १.२८ आहे. सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार, हितचिंतक तसेच बँकेचे अधिकारी, कर्मचारी यांच्यामुळेच हे यश मिळाल्याचे सांगून बँकेचे चेअरमन सुहास पाचपुते, व्हा. चेअरमन सूर्यभान पाटील व संचालक मंडळाने सर्वांचे आभार मानले आहेत. पुढील काळात बँकेच्या डेबिट कार्ड, यूपीआय, आयएमपीएस, मोबाइल बँकिंग इत्यादी आधुनिक डिजिटल व्यवहारांचा ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही पाचपुते यांनी केले आहे.

## विद्यार्थी आणि पालकांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -**
दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात गुरुवार पासून ‘लक्ष्य बॅच इन कॉमर्स’ची उत्साहात सुरुवात झाली. पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे व पालकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.
चार आठवड्याचा विनामूल्य कोर्स आहे. विद्यार्थ्यांना अचूक करिअर निवडण्यासाठी विविध उपक्रम घेऊन त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी या कोर्सचे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीनकर यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. सुवर्णा कारंजे यांनी केले.

## जेएसपीएम संस्थेच्या यशस्वी वाटचालीसाठी प्रयत्नशील रहावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -**
जेएसपीएम संचालित श्री स्वामी विवेकानंद विद्यालयातून ३२ वर्षाच्या सेवेनंतर सहशिक्षक खांडके सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या शैक्षणिक अध्यापनाच्या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रामाणिक अध्यापनाचे धडे त्यांनी दिलेले आहेत. त्यामुळे संस्थेच्या वाटचालीतही त्यांचे योगदान मोलाचे आहे. असे प्रतिपादन जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.
यावेळी राजकुमार खांडके यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त जेएसपीएम शिक्षण संस्थेच्या पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, विष्णू भुतडा, प्रा.सतीश यादव, हरीभाऊ काळे, प्राचार्य गोविंद शिंदे आदी उपस्थित होते.

# शहरातील नारायणा ई-टेक्नो स्कूलला मनसेने ठोकले टाळे

### शिक्षण विभागाने ‘शाळा बंद’ची नोटीस देऊनही शाळा सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -**
शिक्षण विभागाची मान्यता नसलेल्या नारायणा ई-टेक्नो स्कूल या शाळेस महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश सरचिटणीस संतोष नागरगोजे व मनसे विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष किरण चव्हाण यांच्या नेतृत्वात गुरुवारी सकाळी टाळे ठोकून घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. यापुढे शाळा सुरू ठेवल्यास शाळेच्या संचालकांच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

तसेच दोन वर्षांपासून बोगस शाळा सुरू असूनही शिक्षण विभागाने दुर्लक्ष केल्याचे सांगत यावेळी शिक्षण विभागाचा मनसेच्यावतीने निषेध नोंदवण्यात आला.

शिक्षण विभागाने नारायणा ई-टेक्नो स्कूलला १० जानेवारी २०२५ रोजी शाळा बंद करून ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश या शाळेने घेतले आहेत, ते जवळच्या शाळेत स्थलांतरित करावेत. शाळेने नवीन प्रवेश घेऊ नयेत, असे आदेश दिले आहेत. तसेच या शाळेने आरटीई नियमाचे उल्लंघन केल्याने १९ लाख ९० हजार रुपयांचा दंड लावला आहे. तो दंडही शाळेने भरला नाही.

शिक्षण विभागाने ‘शाळा बंद करावी’ असा शाळेत फलक लावला असताना शाळा प्रशासनाने तो फलकही काढून टाकला आहे. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने नारायणा ई-टेक्नो स्कूल ही बोगस शाळा तत्काळ बंद करावी, या मागणीसाठी २५ मार्च रोजी शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी व शाळा प्रशासनास निवेदन देण्यात आले होते. दरम्यान, शिक्षण विभागाच्या आदेशानुसार शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश दुसऱ्या शाळेत स्थलांतरित करणे तर दूरच याउलट नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन पालकांकडून फीसच्या स्वरूपात सत्तर-सत्तर हजार रुपये उकळण्याचे काम या शाळेकडून सुरू होते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व पालकाची फसवणूक होऊ नये यासाठी मनसेच्यावतीने



या शाळेच्या मुख्य प्रवेशद्वाराला टाळे ठोकून निदर्शने करण्यात आली. शिक्षण विभागाचा आदेश डावलून व मनसेच्या आंदोलनाला न जुमानता शाळा प्रशासनाने शाळा सुरूच ठेवली तर मनसेतर्फे शाळेच्या संचालकांच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा देण्यात आला. या आंदोलनात मनसेचे भागवत शिंदे, अंकुश शिंदे, सचिन शिरसाठ, अनिल पांढरे, बजरंग ठाकूर, योगेश सूर्यवंशी, ध्रुव महापूरकर, श्रीनाथ धुर्वे, रवी पांचाळ, केशव लातूरकर, महादेव महाडक, बालाजी गायकवाड, आकाश जोगदंड, सिध्देश्वर रिद्देवाड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होते.

## विद्यार्थ्यांनी शिक्षणा सोबत क्रीडा संस्कृती अंगीकारावी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -**
यश मिळवायचे असेल, तर कठोर मेहनतीला पर्याय नाही. मैदानावर मिळणाऱ्या शिकवणींमुळेच खऱ्या जीवनात मोठे यश संपादन करता येते. शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले असेल, तरच आपण एक उत्कृष्ट डॉक्टर बनू शकतो. विद्यार्थ्यांनी वैद्यकीय शिक्षणासोबत क्रीडा संस्कृतीचा अंगीकार करावा, असे आवाहन एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी केले.





माईर एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालय, एमआयओ ऑप्टोमेट्री महाविद्यालय व प्रयाग कॉलेज ऑफ नर्सिंग महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने एमआयटी शिक्षण संकुल येथे आयोजित विश्वमैदान २०२५ आंतर महाविद्यालयीन क्रीडा संमेलनाचा शुभारंभ कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते क्रीडा ज्योत पेटवून करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, संयोजक डॉ. वर्षा सांगळे यांची प्रमुख उपस्थिती होते. यावेळी डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करुन ती एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे जनरल सेक्रेटरी रुशिल पटाळे यांच्याकडे सुपूर्द केली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ती पुढे पाठवली गेली आणि शेवटी पुन्हा ती डॉ. हनुमंत कराड यांच्याकडे परत सुपूर्द करण्यात आली. यानंतर सर्व सहभागी विविध महाविद्यालयांचे खेळाडू शिस्तबद्ध संचलनात सामील झाले. विविध महाविद्यालयांच्या संघांनी आपापल्या झेंड्यांसह मैदानावर परेड करत आपली शिस्त आणि उत्साहाचे प्रदर्शन केले. संचलनानंतर राष्ट्रगीताचे वादन झाले आणि आकाशात फुगे सोडण्यात आले, ज्यामुळे संपूर्ण क्रीडांगण उत्साहाने भारावून गेले. यासह विश्वमैदान क्रीडा महोत्सव २०२५ ची अधिकृत सुरुवात झाली. या प्रसंगी खो खो, धावणे, शॉट पुट, हॉलीबॉल व रिले स्पर्धेने क्रिडा संमेलनाचा शुभारंभ करण्यात आली.

## शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमाची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -**
राज्य सरकारने सत्तेत येताच प्रशासनाला शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम देऊन सेवा गतीमान करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. यात चांगले यश आले असून, बुधवारी मुख्यमंत्र्यांनी कृती कार्यक्रमांतर्गत केलेल्या कामाची माहिती संकेतस्थळावर टाकण्याची सूचना केल्याने गुरूवारी जिल्हा प्रशासन केलेल्या कामाची माहिती संकेतस्थळावर टाकण्यात व्यस्त होते.

या कार्यक्रमांतर्गत सात कलमी कार्यक्रमाचा अंतर्भाव करण्यात आला होता. सर्व प्रशासकीय विभागांना सेवा आणि उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यामुळे सर्व शासकीय विभाग गेल्या तीन महिन्यांपासून शासनाने सांगितलेल्या कामाच्या अनुषंगाने, कृती करीत होते. राज्य सरकारने आता केलेल्या, प्रगतीपथावर असलेल्या आणि राहिलेल्या कामांची माहिती संकेतस्थळावर टाकण्याची सूचना केली. या अनुषंगाने, लातूर जिल्ह्याच्या प्रशासनाने गुरूवारी यावर प्रत्यक्ष कार्यवाही सुरू केली. पशुसंवर्धन, शिक्षण अशा काही विभागांनी उल्लेखनीय कामे केली.

मात्र, राज्य सरकारने सांगितलेल्या कामांचा धसका घेतला होता. प्रशासनातील प्रत्येक विभाग प्रमुख, कर्मचारी राज्य सरकारच्या कृती कार्यक्रमात व्यस्त असल्याचे सांगत असायचे.

याशिवाय, शंभर दिवसांत सर्व काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट दिल्यानेही अधिकारी, कर्मचारी प्रयत्न करीत असल्याचे चित्र गेल्या तीन महिन्यांत दिसले.

## ई-केवायसीअभावी मोफत रेशन बंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -**
शासनाच्यावतीने रास्तभाव दुकानांतून देण्यात येणारे मोफत धान्य मिळण्यासाठी प्रत्येक रेशनकार्डधारकांना स्वत:सह कुंटुंबीयांची ई-केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. मागील एक वर्षापासून ही योजना सुरू आहे. यात आता सहजताही आणलेली असतानाही अनेक कार्डधारकांनी ई-केवायसीकडे पाठ फिरविली आहे. यामुळे ज्यांची ई-केवायसी झाली नाही, अशा कार्डधारकांचे मोफत रेशन बंद करण्याचे आदेश केंद्र सरकारने दिले आहेत.

या महिन्यापासून याची अंमलबजावणी होणार आहे. ३० एप्रिलपर्यंत ई-केवायसी करण्यास केंद्र सरकारने मुदतवाढ दिली. आहे. लातूर जिल्ह्यात अद्यापही तब्बल २९ टक्के लाभार्थ्यांची ई-केवायसी अपूर्ण आहे. अशा जिल्ह्यातील ५ लाख ८८ हजार ५९३ लाभार्थ्यांचे मोफत धान्य बंद होणार आहे.

केंद्र सरकारच्यावतीने देशातील ८० टक्के लाभार्थ्यांना पुढील पाच वर्षे मोफत धान्य देण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतला आहे. त्यानुसार रेशनचे वाटप सुरू आहे. परंतु, यात काही गैरप्रकार उघड होत असल्याने प्रत्येकाची ई-केवायसी करण्याचा निर्णय घेण्यात आला. मागील वर्षभरापासून ही योजना सुरू असताना अद्यापही अनेक लाभार्थ्यांनी ई-केवायसी केली नसल्याचे दिसून येते. यामुळे केंद्र सरकाने आता ई-केवायसी नसलेल्या लाभार्थ्यांचे धान्य बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. लातूर जिल्ह्यात मोफत धान्य योजनेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या १८ लाख २४ हजार २१६ एवढी आहे.

सुमारे ७० टक्के लाभधारकांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे. अद्यापही २९.५१ टक्के नागरिकांची ई-केवायसी अपूर्ण आहे. आता ज्यांची केवायसी अपूर्ण आहे, अशा जिल्ह्यातील एकूण ५ लाख ८८ हजार ५९१ जणांचे मोफत रेशन बंद होणार आहे.



# आपत्तीचा सामना करण्यासाठी शासकीय यंत्रणांनी सज्ज राहावे

### जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या सूचना



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -**
अवकाळी पाऊस, वादळी वारे, यासारख्या आपत्तींचा सामना करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी सज्ज राहण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात झालेल्या बैठकीत दिल्या.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जाधव यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांनीही अनुषंगिक सूचना केल्या.

आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व तहसील कार्यालये, महापालिका, नगरपालिका व नगरपंचायती यांना विविध साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सर्व साहित्याची सद्यस्थिती तपासून आवश्यक कार्यवाही करावी, असे निवासी उपजिल्हाधिकारी नेटके यांनी यावेळी सांगितले.

महसूल विभाग, जलसंधारण व पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पोलीस विभाग, पशुसंवर्धन विभाग, कृषी विभाग, शिक्षण विभाग आदी विभागांनी आपत्ती काळात करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना दिल्या. सूत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी यांनी केले.

यावेळी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे श्रीराम वाघमारे, अफरोज शेख, प्रतीक देशमुख, लक्ष्मण सादले, भारत पुंडे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

### आपत्कालीन कार्यपध्दती अद्ययावत करा

यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर म्हणाल्या, कोणतीही आपत्ती अचानक येते. त्यामुळे सर्व यंत्रणांनी अशा आपत्तींचा सामना करण्यासाठी सज्ज राहावे. लातूर पाटबंधारे विभाग आणि जिल्हा परिषदेच्या सिंचन तलाव, पाझर तलाव आदी प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित यंत्रणांनी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात. यासोबतच आपत्कालीन परिस्थितीत काय करावे किंवा काय करू नये, याबाबत सर्व विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच आपत्कालीन प्रतिसाद कार्यपध्दती (एसओपी) अद्ययावत करून जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी, अशा सूचना त्यांनी केल्या.

# लातुरात विजांच्या कडकडाटासह पाऊस

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ एप्रिल -**
हवामान खात्याने वर्तविलेल्या अवकाळी पावसाच्या अंदाजानुसार गुरुवारी सायंकाळी लातूर शहरासह जिल्ह्याच्या काही भागात वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाच्या सरी बरसल्या. लातूरमध्ये ढगाळ वातावरण होऊन रिमझिम पाऊस झाला. रेणापूर, औसा, अहमदपूर, निलंगा तालुक्याच्या काही भागात वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला.

मुंबईच्या प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्राने लातूर जिल्ह्यासाठी ३ व ४ एप्रिल २०२५ या दोन दिवसांसाठी ‘यलो’ अलर्ट जारी केला आहे. या दोन दिवसांत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० कि.मी. वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याचा अंदाज वर्तविला आहे. पहिल्या दिवशी हा अंदाज खरा ठरला. गुरुवारी (दि.३) सायंकाळी विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी बरसल्या. वादळामुळे द्राक्षे बागा व आंबा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे अनेकांची तारांबळ उडाल्याचे दिसून आले. या पावसामुळे वातावरणात उकाडा वाढला आहे. हलक्याशा पावसामुळे सुमारे अडीच तास वीज गूल झाली होती. सुरूवातीला अचानकपणे आलेल्या पावसामुळे खरेदीसाठी बाहेर पडलेल्या अनेकांची तारांबळ उडाली. लातूर शहर व परिसरासह जिल्ह्यातील रेणापूर, औसा, अहमदपूर, निलंगा या तालुक्यातील काही गावांमध्ये वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला.

यामुळे आंबा पिकांसह द्राक्षे बागांचेही नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या हलक्याशा पावसामुळे सुमारे अडीच तास शहरातील विविध भागातील वीज गूल झाली होती. तसेच ग्रामीण भागातीलही वीजही बंद-चालू होत होती. यामुळे घरांमध्ये प्रचंड उकाडा जाणवत होता.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (८०) स्विकार

पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करणे कितपत योग्य आहे. स्वामी विवेकानंदांना पश्चिमात्य विचारक म्हणाले आम्ही तुमची आध्यात्मिकता मानू. तुम्ही आमची नवीन विचारधारा समाजवाद मान्य करा. तेव्हा स्वामीजींनी प्रत्युत्तरात म्हटले, अरे, भाऊराया हे ठीक आहे,

परंतु तुमची नवीन विचारधारा प्रयोगावस्थेत आहे. आणि आमच्या विचारधारेचे आयुष्य हजारो वर्षाचे आहे. म्हणून आम्ही तुमचे अनुकरण करणार नाही. श्री. गुरुजी नेहमीच हे उदाहरण देऊन म्हणत असत आम्ही कट्टरवादी, हटवादी नाही पण आम्हाला हे तर पाहू द्या की समाजवादी संघटनेत स्थायित्व येत का. तुमची विचारधारा आजतरी प्रयोगावस्थेत आहे. आपल्या हाताची बोटे समाजवादी भूमिका घेऊ शकतात का? अंगठा तर्जनी- मधले बोट-अनामिका आणि करंगळीला तिची स्वतःची भूमिका वटवावीच लागते. तरच तो हात स्वयंसेवक बनेल. आज कम्युनिझमच्या परिभाषेमुळे वाद होतात आज डांगे म्हणतात


नबुद्रीपाद संशोधनवादी आहेत, तर नबुद्रीपाद म्हणतात डांगे पदभ्रष्ट आहेत. एकूणच

विश्व- साम्यवाद

विश्व-पदभ्रष्टतेच्या वाटेवर आहे. आज रोमन, ग्रीक, पर्शियन या सर्व संस्कृती रसातळाला गेल्या आहेत. अर्थात आमच्या हिंदू संस्कृतीतील अनेक प्राचीन रचनांच्या शाखा किंवा पत्री जीर्ण होऊन गळत आहेत, तर त्यांना गळू द्या. त्याला नवीन अंकुर फुटतील; अर्थात त्यांना स्वीकारताना फक्त एवढंच करा की त्या अंकुराचे, मूळवृक्षासोबत संघजीवन आहे- एकरस जीवन आहे. आपला हिंदू संस्कार एकच.

सभी सुखी हो सभी निरोगी।
मन मे हो सद्भावना।।
निशिदिन प्रतिपल हिंदू करते। सबकी मंगल कामना।। क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती







खुलताबाद नगरपरिषद येथे नव्याने मुख्याधिकारी म्हणून शेख समीर रुजू झाल्यानंतर येथील शहर काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष शेख सलीम जागीरदार तरुण भारतचे पत्रकार संतोष करपे पाटीलने यांनी भेट घेऊन सत्कार केला. खुलताबाद येथील विविध विकासात्मक कामाबाबत पाणी स्वच्छता व नागरिकांच्या मूलभूत सुविधा याबाबत चर्चा केली.

## गल्लेबोरगाव येथील आ प्रशांत बंब यांच्या निधीतील सभागृह, पूर्ण



खुलताबाद : तालुक्यातील गल्ले बोरगाव शिरसाट. राजवडा येथे आमदार प्रशांत बंब यांच्या निधीतून पंधरा लाखाचे सभागृह इमारत बांधण्यात आली. दलित वस्ती शिरसाट राजवाडा येथे जुन्या पडलेल्या चावडीच्या जागेवर आमदार प्रशांत बंब यांच्या निधीतून, माजी सभापती . दिनेश अंभोरे यांच्या सहकार्याने व जेष्ठ समाजसेवक वसंता शिरसाट गल्लेबोरगावकर, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे कचरू नवगे यांच्या प्रयत्नाने पंधरा लाखाचा निधी उपलब्ध करण्यात आला. या कामामुळे या परिसरातील सर्व नागरिकांनी आमदार प्रशांत बंब यांचे विशेष आभार मानले

## प्रा. गजानन दांडगे यांना पीएच. डी. प्रदान



छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कला सादरीकरण (नाट्यशास्त्र) विभागातील प्रा. गजानन जयवंतराव दांडगे यांना विद्यापीठाने आंतर्विद्या शाखेअंतर्गत नाट्यशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी प्रदान केली. त्यांनी 'मराठी रंगभूमीवरील रंगतंत्राचे बदलते स्वरूप : एक अभ्यास (१९८० ते २०१०)' या विषयावर संशोधन केले. या कार्यासाठी त्यांना माजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. जयंत शेवतेकर यांचे मार्गदर्शन लाभले. विभागप्रमुख प्रा. डॉ. वैशाली बोदेले, प्रा. डॉ. स्मिता साबळे, डॉ. शेषराव पठाडे, विद्यापीठातील सर्व अधिकारी, कर्मचारी, मित्र परिवारासह विद्यार्थ्यांनी प्रा. दांडगे यांचे अभिनंदन केले आहे.

## आर्य चाणक्य शाळेचेच नवोदय परीक्षेत यश



पैठण दि ०४ :- भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर, पैठण येथील चि.सोहम नितीन देशपांडे व चि. समर्थ गणेश फटांगडे यांनी नवोदय परीक्षेत यश संपादन केले आहे. १८ जानेवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय परीक्षेमध्ये औरंगाबाद जिल्हा शहरीभागातून पैठण,वैजापूर, कन्नड, सिल्लोड, गंगापूर ,वैजापूर, खुलताबाद, फुलंब्री,सोयगाव या तालुक्याच्या शहरीभागातून ९ विद्यार्थी निवड झाली आहे तसेच १ विद्यार्थी प्रतिक्षा यादीतील असून एकूण २ विद्यार्थी आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिरातील असून त्यामध्ये प्रतीक्षा यादीतील चि.सोहम नितीन देशपांडे व नुकताच लागलेल्या निकालातील चि. समर्थ गणेश फटांगडे यांची निवड जवाहर नवोदय केंद्रीय विद्यालय, कन्नड येथे झाली आहे. विशेष म्हणजे विविध स्पर्धा परीक्षा ऑलिम्पियाड, शिष्यवृत्ती परीक्षेत देखील घवघवीत यश संपादन यापूर्वी दोघांनी मिळविले आहे. या यशाबद्दल चि.सोहम व चि. समर्थ पालकांचे अभिनंदन सर्व स्तरातून होत आहे.

# एस.टी.महामंडळाने प्रवाशांना खासगी वाहतुकीपेक्षा अधिक दर्जेदार सुविधा द्याव्यात- विखे पाटील



अहिल्यानगर दि.३०- ग्रामीण भागाची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एस.टी.महामंडळाने प्रवाशांना खासगी वाहतुकीपेक्षा अधिक दर्जेदार सुविधा द्याव्यात, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

जिल्ह्यातील विविध आगारासाठी प्राप्त झालेल्या नवीन ४५ एसटी बसेसचे लोकार्पण व अहिल्यानगर-पुणे विनावाहक बस सेवेचा शुभारंभ जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते तारकपूर बस स्थानक येथे करण्यात आला.

कार्यक्रमास आमदार शिवाजी कर्डीले, आमदार संग्राम जगताप, अभय आगरकर, बाबू टायरवाले, विनायकराव देशमुख, श्रीमती दानवे, आगार व्यवस्थापक अभिजीत चौधरी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, एसटी बस ही ग्रामीण भागाची जीवनवाहिनी आहे. पूर्वीच्या काळात गावात एसटी बस येणे मोठी मानाची गोष्ट समजली जात होती. आज आधुनिकीकरणामुळे वाहतूक व्यवस्थेमध्ये मोठे बदल झाले आहेत. खासगी वाहतुकीच्या बरोबरीने सेवा देण्यासाठी एसटी महामंडळाच्या ताफ्यात अनेक आधुनिक बस दाखल झाल्या असून याद्वारे महामंडळाने प्रवाशांना अधिक दर्जेदार सेवा देत प्रवाश्यांना एसटीकडे आकर्षित करून घेतले पाहिजे. जिल्ह्यातील एसटी बस स्थानकांचे सुशोभीकरण, बस स्थानकांची व बसेसच्या नियमित स्वच्छतेकडे लक्ष देण्याची गरज आहे. एसटी स्थानकाच्या सुशोभीकरणासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याचेही ते म्हणाले.

कार्यक्रमास सहायक यंत्र अभियंता महेश कासार, शेवंगावचे आगार व्यवस्थापक अमोल कोतकर, भांडार अधिकारी संकेत राजहंस, स्थानक प्रमुख अविनाश कलापुरे यांच्यासह नागरिक उपस्थित होती.

### पालकमंत्र्यांनी केला प्रवास

एसटी बसच्या लोकार्पण कार्यक्रमानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी एसटी बसमधून प्रवास करत प्रवाश्यांना देण्यात येत असलेल्या सुविधांची माहिती घेतली.

### महानगरपालिकेच्या मालकीचे गाळे, वर्ग खोल्या, खुल्या जागांची आजपासून तपासणी मोहीम

# तीन अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली तीन स्वतंत्र पथकांची नियुक्ती : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

### पोटभाडेकरू आढळल्यास गाळे ताब्यात घेणार, अतिरिक्त बांधकाम असल्यास २० हजार दंड

अहिल्यानगर - महानगरपालिकेने स्वतःच्या मालकीचे व भाड्याने दिलेले गाळे, वर्ग खोल्या, खुल्या जागांची तपासणी करण्यासाठी तीन अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली तीन स्वतंत्र पथकांची नियुक्ती केली आहे. ही पथके सर्व गाळ्यांची, खोल्यांची, खुल्या जागांची तपासणी करणार आहे. मूळ मालक नसल्यास व पोटभाडेकरू असल्यास गाळा तत्काळ ताब्यात घेण्यात येणार आहे. तसेच, मंजूर जागेपेक्षा अधिक बांधकाम असल्यास दंड आकारण्यात येणार असून, अतिक्रमण केले असल्यास ते तत्काळ पाडण्यात येणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

महानगरपालिकेने उपायुक्त प्रियांका शिंदे, सहाय्यक आयुक्त सपना वसावा, निखिल फराटे यांच्या नेतृत्वाखाली तीन पथके तयार केली आहेत. प्रत्येक पथकात ५ कर्मचारी देण्यात आले आहेत. शहरात महानगरपालिकेचे ७४२ गाळे, ८२ वर्ग खोल्या, ७४ खुल्या जागा, २ मंगल कार्यालये, ३ पे अँड पार्क, २ व्यायामशाळा भाड्याने देण्यात आल्या आहेत. या सर्व ठिकाणी तपासणीसाठी पथकांना क्षेत्र विभागून देण्यात आले आहे. महिनाभरात पथकांकडून तपासणी पूर्ण करण्यात येणार आहे.

पथकांकडून मूळ मालक आहे की पोटभाडेकरू याची तपासणी करून पोटभाडेकरू असल्यास गाळा तत्काळ ताब्यात घेण्यात येणार आहे. तसेच, कराराची मुदत संपलेली असल्यास मुदत संपल्यापासूनचे आज पर्यंतचे भाडे वसूल करण्यात येणार आहे. भाडे जमा न केल्यास गाळा तत्काळ ताब्यात घेण्यात येणार आहे. तसेच, मंजूर जागा किंवा गाळ्यांच्या क्षेत्रापेक्षा अधिक बांधकाम असेल, पोट माळा केला असेल तर नियमानुसार २० हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे. गाळेधारकाने अतिक्रमण केले असल्यास तेही तत्काळ पाडण्यात येणार आहे. गाळेधारकांकडे २१ कोटी रुपयांची थकबाकी आहे. वर्षभरात ६ कोटी रुपये वसूल झाले आहेत. ज्यांना रेडिरेकनर दरानुसार भाडे परवडत नसेल, त्यांनी गाळे ताब्यात द्यावेत. येत्या एक महिन्यात ही तपासणी पूर्ण करण्यात येणार असून १ मे नंतर थकबाकीदार गाळेधारकांवर कारवाई सुरू करण्यात येणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

# जिल्ह्यातील ३ परीक्षा उपकेंद्राच्या परिसरामध्ये प्रतिबंधात्मक आदेश

अहिल्यानगर दि.४- सैनिकी शाळा प्रवेश परीक्षा २०२५ चे दि. ५ एप्रिल २०२५ रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५ या वेळेत अहिल्यानगर उप विभागाच्या हद्दीतील ३ परीक्षा उप केंद्रावर आयोजन करण्यात आले आहे. उपकेंद्राच्या परिसरात कोणताही गैरप्रकार होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी उप विभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी अहिल्यानगर उप विभागाच्या महसुल स्थळसिमेच्या हद्दीतील परीक्षा उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरामध्ये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

द आयकॉन पब्लिक स्कूल, मल्हार चौक, स्टेशन रोड, वर्का स्कूल अँड जुनिअर कॉलेज, अरणगाव आणि अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज, अहिल्यानगर या तीन उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरामधील सर्व सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी. आय. एस.डी, फॅक्स केंद्र, ध्वनीक्षेपक, झेरॉक्स मशिन, स्कॅनिंग मशिन, मोबाईल फोन व इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमे, वस्तु कार्यान्वित ठेवण्यात येऊ नयेत. परीक्षा उपकेंद्राच्या परिघामध्ये परिक्षार्थी म्हणून घोषित केलेले उमेदवार व परीक्षा पार पाडण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीशिवाय इतर व्यक्तींना वाहनाने अथवा पायी फिरण्यास, उभे राहण्यास प्रतिबंध करण्यात आला असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## भ.महावीर जन्मकल्याणक महिला समितीचा खंडेलवाल नव युवती-चंद्रप्रभू महिला मंडळाच्या पान पाककला व्यंजनांनी आणली स्वादिष्ट चव



छत्रपति संभाजीनगर - भ.महावीर जन्मकल्याणक महिला समिती अंतर्गत नवयुवती मंडळ,चंद्रप्रभू महिला मंडळातर्फे मंगळवारी आयोजित नागेली (खाण्याचे) पानापासून केलेल्या पाककला स्पर्धेत स्वादिष्ट व्यंजने तयार करत आपल्या पाक कलेचे कौशल्य दाखवले.८० स्पर्धकांनी भाग घेतला.

चंद्रप्रभू खंडेलवाल मंदिर हडको येथील उद्घाटन प्रसंगी स.सो.खंडाळकर कैलास कासलीवाल, अशोक अजमेरा मुकेश गंगवाल, स्वप्नील पारख, भारती बागरेच्या संगीता संचेती सारिका साहूजी, सविता लोढा, मनीषा भन्साळी, ललिता साकला, तनुजा गांधी तसेच प्रतीक साहूजी, निलेश जैन, बाहुबली वायकोस, प्रमोद पाटणी, पंकज साखला, भावना सेठीया, करूणा साहुजी, मंगल पारख,कवीता अजमेरा आदींच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. कलाकंद, पकोडे, आईस्क्रीम, तांबूल, केक,अप्पे, नारळ पान गुलकंद लाडू, चॉकलेट लाडू, गुलकंद,पान शॉर्ट, खोबरा रोल, पानवडी, विविध प्रकारची शरबते, बर्फी,थंडाई, मिल्क शेक, मसाला, बिस्कीट रेल्वेवरील पान बर्फी, पानरोल, नॅचरल मसाला पॅटीस, डबल डेकर, मिठाई, आदी विविध पदार्थ बनवून आकर्षक सजावटीद्वारे मांडणी केली होती. सूत्रसंचालन राहुल कासलीवाल यांनी केले स्पर्धा संयोजक मंडळाच्या अध्यक्षा सोनल बडजाते, प्रतीक्षा पापडीवाल, मानसी चांदीवाल, संजना चांदिवाल, सायली बडजाते, विभा कासलीवाल आदींनी परिश्रम घेतले.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचा विद्यार्थी रोहित काळे आयबीपीएस परीक्षेत उत्तीर्ण



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.४ एप्रिल

येथील अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात शिकत असलेला रोहित किशोर काळे हा विद्यार्थी आयबीपीएस परीक्षेत उत्तीर्ण होऊन बँक ऑफ बडोदा या बँकेमध्ये प्रोबेशनरी ऑफिसर म्हणून निवड झाली आहे.त्याचा यशाबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे,प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन केले.

या परीक्षेत यश संपादन करण्यासाठी रोहित काळेला वाणिज्य विभागाचे प्रा.डॉ.निलेश गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. रोहित काळेचे आज समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# जिजाऊ रथयात्रेचे पैठणला जल्लोषात आगमन



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०१ : आज दि. १ एप्रिल रोजी जिजाऊ रथयात्रेची शोभायात्रा पैठणमध्ये सकाळी खंडोबा चौक, येथुन निघून, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज या महामानावांना अभिवादन करून छत्रपती शिवाजी महाराज चौकात आली व छत्रपती शिवाजी महाराज चौकात जिजाऊ रथयात्रेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वागत व मनोगतव रथयात्रेचा उद्देश उपस्थित त्यांना संबोधित करण्यात आले.

जिजाऊ रथयात्रा द्वारे मराठा जोडो अभियान दि.१८ मार्च २०२५ पासून निघालेली जिजाऊ रथ यात्रेचे दि. ३० मार्च रोजी पैठण मध्ये मोठ्या उत्साहात आगमन झाले होते पैठणला या रथ यात्रेचा दोन दिवस मुक्काम होता. यानंतर जिजाऊ रथयात्रा पैठण येथुन ढोरकीन, बिडकीन, चितेगाव मार्गे छत्रपतीसंभाजी नगरला रवाना झाली आहे.

या रथयात्रेमध्ये शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला होता तसेच वारकरी संप्रदायाचे बाल वारकरी देखील या सहभागी झाले होते पैठण मधील बहुजन व शिवप्रेमीं मी या रथयात्रेमध्ये मोठ्या संख्येने आपला सहभाग नोंदवला

यावेळी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष विजय काकडे माजी तालुकाध्यक्ष दशरथ खराद, अरुण गोरडे सर संभाजी ब्रिगेडचे ज्ञानेश्वर जाधव मराठी सेवा संघाचे ज्येष्ठ सदस्य अशोक भागवत दादासाहेब पठाडे असले सर शंकर सपकाळ सह सोमनाथ परदेशी किशोर तावरे ज्ञानेश्वर वाडेकर उबेद संतोष रोडे संतोष गव्हाणे कल्याण भुकेले सुरेश झारगड सुभाष नवथर साईनाथ कर्डिले इत्यादींचा प्रामुख्याने यामध्ये सहभाग होता या शोभा यात्रेमध्ये जिल्हा परिषद सदस्य प्रशाला पैठण श्रीनाथ हायस्कूल पैठण शालिवाहन विद्यालय पैठण प्रतिष्ठान महाविद्यालय पैठण मधील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या शोभायात्राची शोभा वाढवली.

## बाजारपेठेतील उतारचढावांपासून संरक्षण

छत्रपती संभाजीनगर : टाटा ॲसेट मॅनेजमेंटचे सिनियर फंड मॅनेजर श्री चंद्रप्रकाश पडियार यांनी सांगितले, लार्ज आणि मिड कॅप फंडमध्ये गुंतवणूक केल्याने लार्ज कॅप कंपन्यांच्या स्थिरतेचा आणि मिड कॅप कंपन्यांच्या विकास क्षमतेचा लाभ उठवण्याची एक अनोखी संधी मिळते. हा संतुलित दृष्टिकोन जोखीम कमी करण्यात मदत करतो, इतकेच नव्हे तर गुंतवणूकदारांना स्थिर परतावा आणि महत्त्वपूर्ण भांडवल वृद्धी या दोन्हींचे लाभ मिळवून देण्यात मदत करू शकतो, त्यामुळे हा दीर्घकालीन धन निर्माण करण्याचा एक चांगला पर्याय बनतो. गेल्या काही तिमाहींमध्ये कॉर्पोरेट उत्पन्नावर बराच तणाव आहे, डिसेंबर तिमाहीच्या उत्पन्नानंतर आर्थिक वर्ष २०२५ साठी निफ्टी कंसेन्सस ईपीएस अनुमानांमध्ये २% ची घट केली गेली आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये निफ्टीचे कंसेन्सस उत्पन्न ४.४% ने वाढण्याची आशा आहे. ग्रामीण क्षेत्रांमधून उत्तम मागणी, आयकरामध्ये सूट आणि आरबीआयकडून व्याज दरांमध्ये घट यामुळे आर्थिक वर्ष २६ च्या उत्पन्नामध्ये सुधारणा पाहायला मिळू शकते. मोठ्या खाजगी क्षेत्रातील बँका आणि काही एनबीएफसी, खासकरून आरबीआयची मॉनेटरी गुंतवणूक धोरणे, संपत्ती गुणवत्तेमध्ये सुधारणा आणि रेटिंग अपग्रेडसोबत पुढील री-रेटिंग चक्राचे नेतृत्व करू शकतात.

## स्थानिक ते जागतिक स्तरावर प्रगती करण्यासाठी मदत करेल

छत्रपती संभाजीनगर - इफ्फको लोकसभेत त्रिभुवन सहकारी विद्यापीठ कायदा २०२५ विषयी करण्यात आलेल्या घोषणेचे आणि त्यानंतर २६ मार्च २०२५ रोजी कनिष्ठ सभागृहाने दिलेल्या मंजुरीचे स्वागत करत आहे. हे विधेयक जाहीर करताना माननीय सहकार आणि गृहमंत्री श्री. अमित शहा म्हणाले की, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर आज आपल्या देशाला पहिले सहकार विद्यापीठ मिळत आहे. या विधेयकामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल, स्वयंरोजगार आणि लघुउद्योग यंत्रणा विकसित होईल, सामाजिक सर्वसमावेशकता वाढेल व नावीन्य, तसेच संशोधन क्षेत्रात नवे मापदंड प्रस्थापित करण्याच्या संधीही वाढतील. एकप्रकारे सर्व देशाला सहकारवृत्तीने प्रेरित आणि आधुनिक शिक्षणाने सक्षम नवीन सहकारी नेतृत्व मिळेल.

## ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूलतर्फे प्रतिभा शोध आणि तारे निरीक्षण कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर, १ एप्रिल २०२५ : छत्रपती संभाजीनगर येथील टीसीएच ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूल, आडगाव कॅम्पस येथे विद्यार्थ्यांमधील प्रतिभा शोध (टॅलेंट हंट) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानंतर सायंकाळी आयोजित केलेल्या एका जादुई तारेदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. शनिवार, २९ मार्च २०२५ रोजी दुपारी दोन ते रात्री आठ या वेळेत विद्यार्थ्यांनी तारांकित मेळ्याची अनुभूती घेतली. छत्रपती संभाजीनगरमधील नर्सरी ते इयत्ता १० वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम खुला होता. ज्यामध्ये ३० हजार रुपयांपर्यंतची रोख बक्षिसे आणि सर्वांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली.

## महिलांनी आर्थिक साक्षरतेला प्राधान्य दिलेच पाहिजे

मुंबई- सँडविच पिढीतील महिलांनी आर्थिक साक्षरता तसेच त्यांच्या आर्थिक नियोजनाचे नियंत्रण स्वतःच्या हाती घेण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे एडलवाइज लाइफचे चीफ डिस्ट्रिब्यूशन ऑफिसर अनुप सेठ म्हणाले. या संदर्भातील एक अहवाल कंपनीतर्फे अलीकडेच प्रकाशित करण्यात आला. या अहवालानुसार, या पिढीतील ५०% महिलांना आर्थिक गुंतवणुकीच्या साधनांबद्दल असलेली अपुरी माहिती, हे संपत्तीनिर्मिती करण्यामागील एक आव्हान असल्याचे दिसून आले आहे.सँडविच पिढी म्हणजे ३५ ते ५४ या वयोगटातील पिढी. या वयोगटातील व्यक्तींवर वृद्ध पालक आणि वाढत्या वयातील मुले या दोघांची जबाबदारी असते.

## फ़िनेस्टाचा प्रिमियम दर्जाचा खिडक्या आणि दरवाजे आता महाराष्ट्रात

सातारा- फ़िनेस्टा भारतातील खिडक्या आणि दरवाजांकरिताचा एक विश्वसनीय आणि अग्रगण्य ब्रॅन्ड आहे, जो आता महाराष्ट्रातील साताऱ्यामध्ये आपली नवीन शोरूम घेऊन आला आहे. शोरूमचे कार्य, द बाथ स्टुडियो एलएलपीद्वारे कार्यरत केले जाणार असून, ते ३१३/६, प्लॉट क्र.३, महाराणा प्रताप चौक, न्यु राधिका रोड, बसप्पा पेठ , सातारा- ४१५२०२ येथे स्थित आहे. सातारा शहरीकरणाकडे आपली पाऊले झपाट्याने टाकत असताना, प्रिमियम होम सोल्युशन्सची मागणी वाढते आहे आणि म्हणूनच फ़िनेस्टाचा नवीन शोरूमचा माध्यमाने ग्राहकांना एक उच्च-गुणवत्ता आणि व्यापक श्रेणी असलेल्या ल्युमिनियम आणि यूपीव्हीसी चा खिडक्या आणि दरवाजे तसेच सॉलिड पॅनल डोअर उपलब्ध होणार आहेत. शोरूममध्ये प्रदीर्घ अनुभवाने तयार केलेल्या वस्तू उपलब्ध असतील ज्यामुळे घर मालक, आर्किटेक्ट्स आणि बिल्डर्सला लेटेस्ट आणि आधुनिक अशा खिडक्यांचे तंत्रज्ञान बघायला मिळणार आहे.

## आयडीएफसी फर्स्ट बँक ही पेन्शन वितरणासाठीअधिकृत

मुंबई: आयडीएफसी फर्स्ट बँकेने आज जाहीर केले की त्यांना भारत सरकारच्या सेंट्रल पेन्शन अकाउंटिंग ऑफिस (सीपीएओ) ने त्यांच्या वतीने पेन्शन वितरित करण्यास अधिकृत केले आहे.यामुळे बँकेला अखिल भारतीय सेवा अधिकारी, माजी संसद सदस्य, उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश, भारताचे माजी राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती आणि नागरी मंत्रालये आणि विभागांचे अधिकारी (रेल्वे, टपाल, दूरसंचार आणि संरक्षण वगळता) यांचा समावेश असलेल्या केंद्र सरकारच्या निवृत्तीवेतनधारकांना पेन्शन वितरित करण्याची परवानगी मिळते. पेन्शनधारकांना आता त्यांचे पेन्शन थेट त्यांच्या आयडीएफसी फर्स्ट बँक बचत खात्यात मिळू शकते.तांत्रिक दृष्टिकोनातून, सीपीएओ, भारत सरकार आणि आयडीएफसी फर्स्ट बँक यांच्यातील एकात्मता पूर्ण झाली आहे आणि अशा पेन्शन वितरणासाठी तयार आहे.

## 'माय सिटी माय हेरिटेज' वॉकचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर : इंटरग्लोब एंटरप्राइझेसची लोकोपयोग शाखा इंटरग्लोब फाऊंडेशन आणि इंडिगोची उडठ शाखा इंडिगोरीच यांनी सहपीडिया सोबत मिळून छत्रपती संभाजीनगर येथे 'माय सिटी माय हेरिटेज' या एका वेधक वॉकचे आयोजन केले. 'भिक्षुंपासून ते मकबऱ्यांपर्यंत: एका कालातीत शहराचा समृद्ध इतिहास' नामक या इव्हेंटमध्ये या शहरातील शिल्पकलेच्या अद्भुत नमुन्यांच्या व ऐतिहासिक स्थळांच्या माध्यमातून या शहराचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व उलगडण्यात आले. 'माय सिटी माय हेरिटेज' हे एक निरंतर चालणारे अभियान आहे आणि भारतातील वैविध्यपूर्ण सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाबाबत जागरूकता आणण्याच्या उद्दिष्टास ते समर्पित आहे. संवादात्मक आणि अर्थपूर्ण भागीदारींना प्रोत्साहन देऊन भारतातील शहरांच्या मूर्त आणि अमूर्त वारशांचे जतन आणि त्यांचा प्रचार करणे आणि त्याद्वारे त्यांच्या समाजाला आकार देणाऱ्या इतिहास आणि संस्कृतीविषयी जाणून त्याचा सार्थ अभिमान बाळगण्यासाठी लोकांना सक्षम करणे हा या अभियानाचा हेतू आहे. या अभियानाच्या अंतर्गत अशाच पद्धतीचे वॉक प्रयागराज, भुवनेश्वर, शिलॉन्ग, नाशिक, हैदराबाद, कोझीकोड आणि अगदी अलीकडे लखनौ येथे योजण्यात आले आहेत.

## ११ एप्रिल रोजी आईकू जेड१० लाँच होईल

पुणे : उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू ११ एप्रिल २०२५ रोजी भारतात आईकू जेड १० मालिका लाँच करण्यासाठी सज्ज आहे. प्रामुख्याने महाविद्यालयीन विद्यार्थी आणि तरुणांना लक्ष्य करून, आईकू जेड १० हा भारतातील पहिला आणि सर्वात मोठा स्मार्टफोन आहे ज्यामध्ये ७३०० एमएएच बॅटरी आहे जी दीर्घकाळ वापरल्यानंतरही दोन दिवसांपेक्षा जास्त काळ टिकू शकते. हा भारतातील सर्वात पातळ ७३०० एमएएच बॅटरी असलेला स्मार्टफोन आहे ज्याची जाडी फक्त ०.७८९ सेमी आहे. शैक्षणिक, सामाजिक जीवन आणि इतर क्रियाकलापांमध्ये संतुलन राखू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे.

## अग्रलेख...

# सब का साथ, सब का विकास!

राजकारण आणि स्वार्थी कारभाराच्या पडद्याआडून वर्षानुवर्षे सुखैनेव सुरू असलेल्या लांगूलचालनाच्या प्रस्थापित राजकारणाला धक्का बसू लागला आणि अशा राजकारणाचे भवितव्य संकटात आले की भयाने ग्रासलेल्या मनातील मळमळ कशी बाहेर पडते, याचे काही दाखले बुधवारी देशाने अनुभवले. धर्माच्या नावाखाली समुदायाच्या हिताची पत्रास न बाळगता सुरू असलेल्या मनमानीला चाप बसण्याच्या भयाने काही मूठभरांच्या मनात उमटणारी अस्वस्थतादेखील या निमित्ताने देशाला अनुभवता आली. वक्फ बोर्डाचे व्यवस्थापन आणि वक्फच्या व्यवस्थापनामागील धर्माधारित व्यवस्था यातील भेदाव या निमित्ताने जे काही विचारमंथन संसदेत झाले, त्यामुळे देशात व्यापक जनजागृती तर झालीच; पण वक्फचा बुरखा पांघरून व्यवस्थेलाच नख लावणाऱ्या प्रवृत्तीचे असंख्य कारनामे संसदेच्या पटलावर नोंदविले गेले. मुस्लिम वक्फ (रद्द) विधेयकांवरील चर्चेच्या निमित्ताने काँग्रेसशासित विचारसरणीचे पितळ उघडे पडले आणि समाजहिताच्या उद्देशाने धार्मिक भावनांच्या आधारावर सुरू असलेल्या एका सद्भावनेची कुचेष्टा थांबवून मुस्लिम समाजाच्या हिताच्या नव्या पर्वाची पायाभरणी लोकसभेत झाली. याआधी तीन तलाकसारख्या कुप्रथेला पायबंद घालण्यासाठी मोदी सरकारने घेतलेल्या धाडसी निर्णयानंतर या समाजाच्या परिवर्तनाचे पहिले पाऊल पडले होते. आता वक्फ मालमत्तांवरील स्वार्थी मक्तेदारीची पकड दूर करून या मालमत्तांचा वापर केवळ मुस्लिम समुदायाच्या हित व प्रगतीसाठीच व्हावा, याकरिता मोदी सरकारने पुढचे पाऊल टाकले आहे. हे विधेयक बहुमताने मंजूर करून घेण्याकरिता संसदेच्या सभागृहातील संख्याबळाचे कुशल व्यवस्थापन करीत प्रगतीच्या दिशेने सुरू झालेल्या प्रवाहात मुस्लिम समाजासही सामावून घेण्याचा ऐतिहासिक प्रयोग यशस्वी करून मोदी सरकारने सुरू केलेल्या या परिवर्तनशील पर्वाचे स्वागत करावयास हवे. समाजातील गरीब वर्गास शिक्षण, आरोग्य सेवा, निवारा आणि उपजीविकेचे अन्य आवश्यक आधार सहजपणे प्राप्त करून देता यावेत, यासाठी वक्फ नावाची धर्माधारित व्यवस्था मुस्लिम समाजात इतिहासकाळापासून अंमलात आहे. मात्र, मनमानी कारभार, ढिसाळ व स्वार्थी व्यवस्थापन, भ्रष्टाचार आणि अकार्यक्षमता, समाजहिताच्या जाणिवेचा अभाव आणि सामाजिक प्रगतीबाबतची उदासीनता अशा अनेक कारणांच्या विळख्याने वक्फ व्यवस्थेस वर्षानुवर्षे ग्रासले होते. समाजाच्या हितासाठी विनियोग करण्याच्या हेतूने दान म्हणून प्राप्त झालेल्या लाखो-कोटी किमतीच्या मालमत्तेची मनमानी विल्हेवाट लावण्याच्या प्रवृत्तींना राजकारणाची साथ मिळाली की, समाजहिताच्या भावनेचे कसे वाटोळे होते, ते वक्फ व्यवस्थापनातील गैरप्रकारांच्या दाखल्यांवरून स्पष्ट झाले आहे. मुस्लिम समुदायातील असंख्य कुटुंबे आजही जगण्याच्या पुरेशा सुविधांपासून वंचित असताना व वक्फला दानरूपाने प्राप्त झालेल्या संपत्तीच्या निर्विवाद लाभाचा हक्क असतानाही, अशी असंख्य कुटुंबे या लाभापासून वंचित राहिल्याने, वक्फसंबंधीच्या कायद्यात दुरुस्ती करून वक्फचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक, प्रामाणिक आणि प्रभावी करण्याची गरजच होती. मोदी सरकारने ती ओळखली आणि वक्फ कायद्यातील त्रुटी दूर करून प्रभावी अंमलबजावणीस उपयुक्त ठरणाऱ्या दुरुस्त्या करणारा कायदा संसदेत सादर केला. बहुप्रतीक्षित अशा या कायद्याची खरी गरज असतानाही, विरोधकांनी केलेल्या विरोधामागे केवळ राजकीय हेतू असल्याचे बुधवारच्या चर्चेत सहभागी झालेले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, रविशंकर प्रसाद आणि भाजपाप्रणीत रालोआच्या खासदारांनी सप्रमाण दाखवून दिल्याने वक्फच्या गैरवापरातून आपले उखळ पांढरे करणाऱ्या प्रवृत्ती उघड्या पडल्या आहेत. पारदर्शकतेचा अभाव ही वक्फच्या व्यवस्थापनातील सर्वात मोठी त्रुटी आहे. त्यातूनच भ्रष्टाचार बोकाळला आणि संपत्तीचा दुरुपयोग सुरू झाला. नव्या विधेयकामुळे वक्फच्या संपत्तीच्या व्यवस्थापनास शिस्त लागून संपत्तीची व संपत्तीच्या विनियोगाची व्यवस्थित नोंद केली जाईल. ज्या हेतूने वक्फ मंडळांकडे ही संपत्ती दान केली गेली, त्याच हेतूसाठी विनियोग व्हावा व दुरुपयोग टळावा हा मुख्य हेतू नव्या विधेयकामुळे साध्य होईल, हा सरकारचा विश्वास हीच अमृतकाळातील एक आगळी घटना ठरणार आहे. वक्फच्या जमिनींवर धनदांडग्यांनी केलेला अनधिकृत कब्जा यापुढे दिसणार नाही, तर अशा जमिनी मोफत आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या दवाखाने व इस्पितळांच्या उभारणीकरिता वापरता येतील, वक्फच्या ताब्यात असलेल्या पैशातून गरीब कुटुंबांतील मुलांसाठी शिक्षणाच्या सुविधा निर्माण केल्या जातील, रोजगाराभिमुख योजनांद्वारे युवकांच्या क्षमता वाढविणारे उपक्रम राबविले जातील, बेघरांच्या डोक्यावर छप्पर मिळेल, निराधारांना आश्वस्त आधार प्राप्त होईल आणि वक्फच्या ताब्यात असलेल्या प्रत्येक पैशाचा उपयोग केवळ समुदायातील गरजूंच्या गरजा पूर्ण करण्याकरिताच केला जाईल, अशी पारदर्शक व्यवस्था नव्या कायद्यानुसार प्रस्थापित झाली, तर गरिबी निर्मूलनाच्या मोहिमांना बळ मिळेल, यात शंका नाही. देशभरात वक्फच्या ताब्यात असलेल्या जवळपास ५८ हजार ८९८ मालमत्तांवर बेकायदा कब्जा केला गेल्याची बाब उघडकीस आली आहे. बेकायदेशीरपणे बळकावलेल्या अशा जमिनी पुन्हा ताब्यात घेऊन त्यावर समाजोपयोगी उपक्रम राबविण्याकरिता व वक्फच्या मालमत्तांच्या रक्षणाकरिता जिल्हाधिकाऱ्यांस विशेष अधिकार प्रदान करण्यात येणार आहेत. या अधिकारांचा निःपक्ष वापर झाला, तर वक्फ ही मुस्लिम समाजाच्या उत्कर्षाची नवी नांदी ठरणार आहे. बुधवारी लोकसभेत या विधेयकावरील चर्चेत सहभागी झालेले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी वक्फच्या इतिहासाची पाने संवेदनशीलतेने उघडली आणि मुस्लिम समुदायातील सामाजिक जाणिवांचा एक हळवा कंगोरा देशास पाहावयास मिळाला. वक्फचा इतिहास आणि वर्तमान यातील विसंगतीवर नेमके बोट ठेवून शाह यांनी मांडलेल्या वास्तवातून जाणिवा जाग्या झालेल्या कोणाही समंजस व्यक्तीला या संकल्पनेच्या वर्तमानाचे वास्तव पाहून लाज वाटावी अशीच परिस्थिती आहे. वक्फच्या गैरवापरात काँग्रेसी संस्कृतीचा मोठा सहभाग असल्याची जाणीव या चर्चेचे साक्षीदार असलेल्यांना निश्चितच झाली असेल. एकगठ्ठा मतपेढ्या निर्माण करण्यासाठी धार्मिक भावनांशी असे खेळ करणाऱ्यांचे खरे चेहरे उघड झाल्यामुळे राजकारणाची अप्रिय बाजूदेखील समोर आली आहे.

धार्मिक संस्थांच्या व्यवस्थापनात बिगर-मुस्लिम व्यक्तींची नियुक्ती करण्याची कोणतीही तरतूद नाही आणि आम्हाला अशी तरतूद करायचीही नाही, अशी निःसंदिग्ध ग्वाही देऊन अमित शाह यांनी विरोधकांच्या बिनबुडाच्या असलेल्या आरोपांतील हवा अगोदरच काढून टाकली आहे. हे विधेयक मुस्लिमांच्या धार्मिक कार्यांत आणि त्यांनी दान केलेल्या मालमत्तेत हस्तक्षेप करण्यासाठी आणले आहे असल्याचा अपप्रचार करून अल्पसंख्यक समुदायाला धमकावून मतपेढी उभारण्याच्या राजकारणास या विधेयकाने वेसण घातली आहे. वक्फ बोर्ड किंवा त्याच्या परिसरात नियुक्त केलेले बिगर-मुस्लिम सदस्य केवळ वक्फचे व्यवस्थापन आणि संपत्तीच्या विनियोगावर देखरेख ठेवतील, या त्यांच्या स्पष्टीकरणामुळे संशय पेरण्याच्या प्रयत्नांची बिळे बुजविली गेली आहेत. वक्फ ही धार्मिक बाब आहे, परंतु वक्फ बोर्ड किंवा वक्फ परिसर या धार्मिक बाबी नाहीत. त्यामुळे वक्फ मंडळाचा कारभार कायद्यानुसार चालावा, याची खात्री करण्याचे काम या मंडळाचे असेल. संसदेने संमत केलेल्या या कायद्याचे पालन प्रत्येक संबंधितास करावेच लागेल, हेदेखील शाह यांनी ठणकावून सांगितले. त्यामुळेच मतांच्या राजकारणासाठी वक्फचा वापर करणारे असोत किंवा वक्फच्या मालमत्ता मनमानीपणे विकून खाणारे असोत, त्यांची हकालपट्टी आता निश्चित झाली आहे. या कायद्यास विरोध करणाऱ्यांपैकी काहींना भविष्याच्या या भयानेच ग्रासले असण्याची शक्यता असावी. कागदावरचा कोणताही कायदा अंमलबजावणीच्या रूपाने कृतीत उतरल्याखेरीज त्याचे गांभीर्य स्पष्ट होत नाही. वक्फ बोर्डाच्या कारभारास वेसण घालणाऱ्या या कायद्यावर संमतीची मोहोर स्पष्टपणे उमटल्यानंतर आता कायद्याने दाखविलेल्या दिशेने कृती सुरू झाली की, संभ्रम पेरणाऱ्या आणि संभ्रमाच्या प्रभावामुळे गैरसमजात वावरणाऱ्या सर्वांना सरळमार्गी व्हावेच लागेल. अमृतकाळातला हा सरळ मार्ग सोपा करण्याच्या या प्रयत्नाचे स्वागत व्हायलाच हवे!

## जीवन जिज्ञासा

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

# महाभारत ते भारत (१६)

संपूर्ण जगात विविध देशांत सृष्टीचे, विश्वब्रह्मांडाचे स्वरूप उत्पत्ती रचना, प्रकार, विविध प्रकारचे स्तर, सृष्टीचे वय, तिचा विनाश या सर्व महत्त्वाच्या विषयांबाबत प्रचंड संशोधने चालू आहेत. त्यामुळे दर क्षणाला ज्ञानाचा विस्फोट होतो आहे. काही वर्षांपूर्वी ताजे वाटणारे ज्ञान आज शिळे, टाकाऊ स्वरूपाचे वाटू लागले आहे. आजच्या परिभाषेत 'बॅक-डेटेड' हे होणे स्वाभाविक आहे. याचा अर्थ आधी संपादन केलेले ज्ञान व्यर्थ गेले, असे समजण्याचे कारण नाही. मागील प्राप्त झालेले ज्ञान हे पुढील ज्ञान प्राप्तीचे साधन ठरले आहे. त्या ज्ञानाची, साधनेची किंमत आहेच. कोणत्याही शास्त्रीय ज्ञानाचा प्रवास असाच होत आला आहे. भारतीय ज्ञानपरंपरेत म्हणूनच ज्ञानाला महासागराची उपमा दिली आहे किंवा अनंत आकाशाचा जसा शोध लागत नाही, विविध प्रकारचे शक्तिशाली अग्निबाणांच्या साह्याने पाठविलेल्या अवकाश यानांना (स्पेस क्राफ्ट) सुदूर अंतरिक्षात पाठवूनही अवकाशयात्रीसमोर पसरलेले अफाट क्षितिज कायमच राहते - म्हणजे विश्व हे अनंतच (इनफिनिट) आहे, याची जाणीव होते. ज्ञानाच्या या मर्यादा वेदकाळापासून भारतीयांनी अगदी स्पष्टपणे ओळखल्या होत्या. भारतीय संस्कृतीच्या प्रदीर्घ वाटचालीत जे 'ज्ञानसूर्य' ज्ञानाचे दीपस्तंभ म्हणून ओळखले जातात, अशा अनेकांनी ज्ञानाची महती मुक्त कंठाने सांगितली आहे. गोष्ट वा प्रसंग आद्य शंकराचार्यांच्या जीवनातला आहे. शंकराचार्यांचा भारताचा हा दुसरा प्रवास चालू होता. त्यांच्या जीवनातील या टप्प्याला त्यांची 'दिग्विजयी यात्रा' असे त्यांच्या चरित्रकारांनी म्हटले आहे. कारण कुमारील भट्टाच्या सूचनेप्रमाणे अवैदिक आणि जडस्वरूपी तत्त्वज्ञानाचा प्रसार-प्रचार करणारे जे विविध संप्रदाय आहेत. ज्यांच्यामुळे सनातन धर्माचे अधिष्ठान म्हणजे अस्तित्व डळमळीत होऊन राहिले, वैदिक संस्कृतीचा विनाश होऊ घातला आहे, अशा बौद्ध, जैन, मीमांसक, जड कणादवादी, तांत्रिक, अवघडपंथी अशा सर्व सांप्रदायांचार्यांशी वाद करून त्यांना वैदिक तत्त्वज्ञानाचे महत्त्व पटवून ते हिमालयाकडे आपल्या प्रमुख शिष्यांसह प्रवास करीत असताना हृषीकेश येथे त्यांचा मुक्काम होता. या संपूर्ण प्रवासात मेधावी असलेले त्यांचे शिष्य सुरेश्वराचार्य, पद्मपादाचार्यादि शिष्यांनी त्या वादचर्चा स्वतः उपस्थित राहून ऐकल्याच होत्या. त्यामुळे त्यांना आपल्या गुरुठायी असलेल्या ज्ञानाचे दर्शन झाले होते. त्याने ते भारावून गेले होते. त्याच भावनेने त्यांनी गंगा किनारी स्नान, आन्हिक होऊन वाळत घातलेल्या आपल्या वस्त्राची वाट पाहतानाच्या वेळेत सहजपणे त्यांच्या या अगाध ज्ञानसामर्थ्याबद्दल त्यांच्याशी विचारणा केली. त्यावेळी शंकराचार्यांनी त्यांचा दीक्षा दण्ड घेतला. तो गंगेच्या पाण्यात बुडविला आणि काढला. वर धरला आणि शिष्यांना म्हणाले, पहा.! त्या भिजलेल्या दण्डाचे पाणी ओसरून गेले होते आणि टोकावर शेवटचा 'थेंब' लटकलेला, पडण्याच्या बेतात असलेला त्यांनी पाहिला. शंकराचार्य म्हणाले- 'समोर गंगोत्रीपासून समुद्राला मिळणाऱ्या व हजारो मैलांचा प्रवास करणाऱ्या गंगामातेच्या प्रवाहात असलेल्या अथांगपणाच्या तुलनेत एका बिंदूसारखे माझे ज्ञान आहे.' शिष्य काय समजायचे ते समजले. आजच्या परिस्थितीच्या संदर्भात याचे चिंतन होणे जरूर आहे. त्यासाठी हा प्रसंग सविस्तरपणे वर्णिला आहे.

रामायण, महाभारत या महाकाव्यांमध्ये व्यक्तिजीवनापासून तो सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि राष्ट्रजीवनापर्यंत जो एक प्रचंड कर्मशक्तीचा ओघ वाहताना आपण पाहतो त्या तुलनेत आज भारताचे वारसदारांची अवस्था काय? कुटुंबातील ज्येष्ठ पुत्र; मग ते राम असो वा युधिष्ठिर, त्यासाठी आवश्यक असलेल्या पुत्रधर्मापासून तो पुढे राज्याचे प्रमुख झाल्यानंतरच्या राजधर्मापर्यंत जीवनात कर्तव्यबोध आहे. त्याग आहे. राजा म्हणजे प्रजेचा पिता असतो, याची जाण आहे. राजा म्हणजे राज्याचा उपभोगशून्य स्वामी, ही श्रेष्ठ, विरागी 'ट्रस्टिशिप' आहे. हिंदू जीवन पद्धतीला अनुसरून शाश्वत जीवनमूल्याधिष्ठित अनुशासित जीवनाची चौकट आहे. त्या चौकटीमुळे सर्व ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात आमची प्रगती होती. जीवन आणि राष्ट्रजीवनी समृद्ध, सुरक्षित आणि अकुतोभय करण्याची आकांक्षा होती. त्यासाठी वेळप्रसंगी स्वर्गात जाऊन दिव्यास्त्रे संपन्न करण्याचा दृढ संकल्प होता. तो साध्य करण्याच्या मार्गात उर्वशीसारख्या रंभा आणि मेनकेपेक्षाही अधिक मादक, शृंगारकुशल आणि मोहक असलेल्या अप्सरेच्या मोहजालाला झिडकारण्याचे नैतिक धैर्य होते. आजच्या परिभाषेत पाकिस्तानने 'डेप्यूट' केलेल्या स्त्री हेराच्या 'केमिस्ट्री'ला न जुमानता आपले अस्त्रसंपदेचे रहस्य तिला देऊन देशद्रोह करण्याचे पातक हातून होत नव्हते. त्याचाच परिणाम म्हणून भगवद्गीतेच्या आध्यात्मिक ज्ञानसंपदेपासून तो कुरुक्षेत्रावरील अणुविज्ञानाधिष्ठित अस्त्रसंपदेपर्यंत भारतीय प्रज्ञेचा अप्रतिहत संचार होता. त्यातून अनेक ज्ञान शाखा संपन्न झाल्या. तपश्चर्येतून प्राप्त झालेले हे ज्ञान त्यांनी ग्रंथरूपाने पुढील वारसदारांसाठी हे मागील पिढीतील लिहून ठेवले. काळाच्या ओघात, नृशंस आक्रमणकारी धर्मांधांनी ते नष्ट केले. गो. प्र. भावे हे मागील पिढीतील व्यासंगी आणि सिद्धहस्त लेखक होते. पुरीच्या शंकराचार्यांचे ते अनुग्रहित होते. चांगले साधक होते. गायत्री मंत्राचे चोवीस लक्षांची अनेक पुरश्चरणे त्यांनी केली होती. प्राचीन मंत्र विज्ञान आणि त्यावर आधारित अस्त्र संपदा या विषयावर त्यांचा सखोल अभ्यास होता. माझ्या भाग्याने कारंजा येथील गुरुमंदिरात त्यांच्या सहवासाचा लाभ मला मिळाला. त्यांनी एक विलक्षण आठवण सांगितल्याचे स्मरते. ते म्हणाले- हिमालयाची यात्रा करताना मी पशुपतिनाथाच्या दर्शनाला गेलो असताना नेपाळच्या लायब्ररीला भेट दिली. तिथे मला जामदग्न्य धनुर्वेदाची पूर्ण संहिता आढळली. डाव्या पानावर विविध अस्त्रे, त्याचे श्लोक म्हणजे 'फॉर्म्युले', त्याचे विवरण, पुढील पानावर त्या अस्त्राची रेखाकृती, विविध पार्टस, त्याचे माप, संधान (टेक-ऑफ) होतेवेळी निर्माण होणारी उष्णता इत्यादीचा संपूर्ण तपशील होता. परत-परिक्रमा आटोपून मी ज्यावेळी आलो त्यावेळी कळले की, एका जर्मन परदेशी पर्यटकाने तो ग्रंथ काही लाख रुपयांच्या मोबदल्यात विकत घेतला. त्यावर त्यांनी अनेक प्रकारचे संशोधन केले.

महाभारतात गीता आहे. गीतेने म्हटले आहे, 'ज्ञानासारखे पवित्र दुसरे काहीही नाही.' त्या पवित्र ज्ञानग्रंथांचा 'व्यापार' करणारे भरताचे वारसदार आम्ही! ते ज्ञान ऋषिमुनी, महर्षी विश्वामित्र, ब्रह्मर्षी वशिष्ठ यांच्या आश्रमरूपी सरस्वती सदनातून सामान्य लोकांपर्यंत गेले म्हणून भिल्ल समाजातूनही विख्यात धनुर्धर आणि गुरुभक्तीचा आदर्श निर्माण करणारा 'एकलव्य' निर्माण झाला. त्याच भारतात शिक्षणाचा 'धंदा' करणारे अनेक 'शिक्षण महर्षी' आज उभे राहिले आहेत. भारताच्या पवित्र शैक्षणिक संस्कार, नीतिमूल्यांना बेधडक अंगठा' दाखवीत आहे. त्यांचा 'अंगठा' कापणारा 'द्रोणाचार्य' भारतात येईल?

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# 'घिब्ली' वाळवंटातील गरम वाऱ्याची भुरळ

'दुनिया झुकती है झुकाने वाला चाहिये' असे म्हटले जाते. ते बरेचदा १०० टक्के खरे ठरते. मोबाईलने ज्यांना आपल्या मुठीत बंदिस्त केले, त्या नवीन पिढीसोबत वयस्कही मोबाईल वेडे झाले आहेत. त्या वेडेपणाचा फायदा घेत त्यांना पुन्हा पुन्हा गुंतवून ठेवण्यात व्यावसायिक यशस्वी ठरतात आणि आपल्याकडे त्याची क्रेझ ठरते! चांगले ते स्वीकारण्याची आपली परंपराच आहे. परंतु, वाईट ते दूर सारण्यात आपण थोडे दुबळे ठरतो. जेव्हा ते मानगुटीवर बसते, त्याला आपण बाहेर खेचण्याचा प्रयत्न करतो तोपर्यंत त्याने आपल्याला विळखा घातलेला असतो. चक्रव्यूहातून अभिमन्यू बाहेर पडू शकला. परंतु, या कृत्रिम बुद्धिमत्ता आपली मती मारण्यापर्यंत पोहोचल्याने त्यातून बाहेर निघण्यासाठी धडपड करावी लागणार आहे. 'एआय'ने सुविधा उपलब्ध करून दिल्या असल्या, तरी त्याचे दुरगामी परिणाम भोगण्याची तयारीही भविष्यात ठेवावीच लागणार आहे. शिक्षणाचे व्यवसायीकरण झाल्याने ते पावित्र्यच शिल्लक राहिले नाही. त्यामुळे आता स्वतःच्या मेंदूचा वापर जिथे एआयसाठी नेटवर्क नाही तेथेच करावा लागणार आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील अनेक अडचणी शिक्षकाशिवाय एआय सोडवत असल्याने त्या समस्या सोडविण्यासाठीची माथापच्ची करण्याची सवय आता इतिहास जमा होणार आहे. इंटरनेट आपल्यासोबत ई-मेल, फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर, यू ट्युब, इन्स्ट्रा घेऊन आले. त्यावरही थांबले नाही तर चॅट जीबीटी आले. जेमिनीने तर मनोरंजनच केले. आता गेल्या १५ दिवसांपासून स्वतःचीच प्रतिमा वेडीवाकडी पाहण्यासाठी आपण उत्सुक झालो आहोत. ओपन-एआयच्या चॅट जीपीटीने युजर्ससाठी 'घिब्ली' सेवा सुरू केली. आता त्याचा महापूर आला आहे. घिबली वगैरे म्हणून घिब्लीचे बारसे होऊ लागले. प्रत्येक जण घिब्ली स्टाईल स्वतःचे कार्टून तयार करून घेत आहे. ते एकप्रकारचे व्यंग्यचित्रच आहे. आजपर्यंत बड्या आसामींचे व्यंग्यचित्र काढले जात होते. त्यावर चर्चा होत होती. कधी कधी रागलोभही होत होते. आता घिब्लीने त्या कलेलाही सामान्य करून टाकले. कलाकार, राजकीय नेतेच नव्हे तर सामान्य नागरिकही घिब्लीच्या गळाला लागले आहेत. जगभरातील सर्वच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर चॅट जीपीटीच्या घिब्ली जनरेटेड कलाकृतींचा पूर आला आहे. अनेक युजर्स याचा वापर करून त्यांच्या कुटुंबातील सदस्य, मित्रांचे घिब्ली स्टाईल छायाचित्र तयार करत आहेत. इतकेच नव्हे, तर बड्याबड्यांनादेखील या ट्रेंडची भुरळ पडली असून ते याचा वापर त्यांच्या जाहिरातीसाठी करीत आहेत. चॅट जीपीटीवरील या नवीन वैशिष्ट्यांमुळे युजर्स मोठ्या प्रमाणात घिब्ली शैलीतील एआय जनरेटेड छायाचित्र तयार करत करून घिब्ली शैलीतील छायाचित्रे ते सोशल मीडियावरही शेअर करत आहेत. डोनाल्ड ट्रम्प, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शाहरूख खानपर्यंत अनेकांची घिब्ली छायाचित्रे फेसबुकवर आहेत. बॉलिवूड चित्रपटांमधील फिर हेराफेरी, बाहुबली, भुलभुलय्या आणि शाहरूख खानच्या जगप्रसिद्ध 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' यातील काही दृश्यांच्या छायाचित्रांचाही समावेश आहे. १९८५ मध्ये हयाओ मियाझाकी इसाओ ताकाहाता आणि तोशियो सुझुकी यांनी स्थापन केलेला 'स्टुडिओ घिब्ली' हा एक प्रसिद्ध जपानी ॲनिमेशन स्टुडिओ आहे. 'घिब्ली' या इटालियन भाषेतील शब्दाचा मराठी अर्थ 'सहारा वाळवंटातून वाहणारा गरम वारा' असा आहे. उन्हाळ्यात थंड वाऱ्याची गरज भासत असताना घिब्लीच्या निमित्ताने वाहू लागलेल्या या गरम वाऱ्यावर आपण सारे स्वार झालो आहोत. सामान्य मानसिकतेप्रमाणे कोणालाही कार्टुन म्हटले तर राग येत होता. आता स्वतःचे कार्टुन स्वतः तयार करून ते समाज माध्यमांवर टाकले जात आहे. मोबाईलच्या अति आहारी गेल्याचे दुष्परिणाम आपण बघतो आहोत. विरंगुळा म्हणून आज आपण घिब्लीकडे बघतो आहोत. परंतु, कोणत्याही प्रसंगातील (तिरडीवर असलेला मृतदेहाचे फोटो सोडून) व्हॉट्सॲप स्टेटस टाकण्याची चढाओढ लागली आहे. त्या स्टेट्सने घरगुती वादही सुरू झाले आहेत. आज आनंद देणारा हा ॲप भविष्यात एखाद्याची खिल्ली उडवण्यासाठी वापरण्याचाही धोका ओळखला पाहिजे. घिब्लीचे कार्टुन समाजमाध्यमांवर टाकल्या जाते. परंतु, त्याच्या बाजूला तुमचा ओरिजनल फोटो असल्याशिवाय ते कार्टुन कोणाचे हे ओळखले जाऊ शकत नाही. समाजमाध्यमांवर प्रत्येक दुसरी पोस्ट घिब्लीची दिसून येत आहे. आपण फुकट मिळण्यावर तुटून पडतो, अशी टीका समाजमाध्यमांवर सुरू आहे. घिब्लीत काय म्हणून मागे राहायचे... तुम्हीच सांगा आपण आता रिअल वर्ल्डमध्ये जगत आहोत की ॲनिमेटेडमध्ये... वास्तवात जगलेले केव्हाही चांगलेच ना! 'आम्ही जातो आमच्या गावा' या चित्रपटातील 'देहाची तिजोरी' या भावगीतातील 'आपुलीच प्रतिमा होते आपुलीच वैरी'प्रमाणे अति होऊ नये म्हणजे मिळवले.

९८८१९०३७६५

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# भरवसा नसलेले नेते



एका चॅनेलवरील कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत नुकतीच झाली. या मुलाखतीचे विशेष म्हणजे शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ही मुलाखत घेतली. समारोपाच्या भागात जयंतरावांनी फडणवीसांना नेमके प्रश्न विचारले. त्याचे उत्तर दोन-दोन वाक्यात द्यायचे होते. 'शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याबद्दल सांगा' असा एक प्रश्न होता. 'काही भरवसा नाही' या एका वाक्यात फडणवीसांनी उत्तर दिले. महाराष्ट्राच्या राजकारणात केंद्रस्थानी राहिलेल्या या दोन नेत्यांची इतकी नेमकी ओळख कोणाला करून देता आली नसेल. त्यावर उखडणार नाहीत तर ते उद्धव ठाकरे कसले? मीडियाने त्यांना छेडले असता उद्धव ठाकरे यांनी एका पांचट गाण्याची आठवण करून दिली... 'सोनू, तुझा माझ्यावर भरोसा नाय का?' हे ते गाणे होते. अलिकडे राजकारणाचा पोत बदलला आहे. विश्वासार्हता उरली नाही. शर्ट बदलावा तसे नेते भूमिका बदलतात. शरद पवारांनी वसंतदादांच्या पाठीत खंजीर खुपसला हे उदाहरण खूप जुने झाले. राजकीय खुपसा-खुपसीची ताजी उदाहरणेही आहेत. सोनिया गांधी इटालियन आहेत म्हणून राष्ट्रवादीची वेगळी चूल मांडणारे शरद पवार पुढे सोनियांच्या नेतृत्वातील सरकारमध्ये कृषिमंत्री म्हणून गेले. आयुष्यभर संभ्रमावस्थेत जगलेल्या या 'जाणत्या राजा'मध्ये उद्धव ठाकरेंना स्वतःचे मुख्यमंत्रिपद दिसले. २०१९ मध्ये युतीला टांग मारून उद्धव ठाकरे हे शरद पवारांच्या मांडीवर गेले. गद्दारीचा इतिहास नव्याने लिहिला गेला. पण त्या आधीही म्हणजे २०१४ च्या निवडणुकीत बरेच काही घडले होते. जागावाटपावरून युती तुटली. या निवडणुकीतले विशेष म्हणजे आघाडी आणि युतीतले चारही पक्ष स्वतंत्र लढले. निकालानंतर शिवसेनेने विरोधात बसायचं ठरवलं होतं. राष्ट्रवादीने बाहेरून पाठिंबा देण्याची गोष्ट सुरुवातीला केली होती. आवाजी मतदानाने सरकारवरील विश्वासदर्शक ठराव मंजूर झाला तेव्हा राष्ट्रवादीने सभात्याग केला होता. प्रत्यक्षात अल्पमतातले सरकार आले होते. त्यानंतर उद्धव ठाकरेंची शिवसेना गळाला लागायला तब्बल तीन महिने लागले होते. भाजपा आणि शिवसेना यांनी युतीने २०१९ ची निवडणूक लढवली होती. सरकार बनवण्याएवढे बहुमतही युतीला मिळाले. मात्र निकालानंतर उद्धव ठाकरे फिरले. शरद पवारांसोबत बसून त्यांनी महाविकास आघाडी बनवली आणि काँग्रेसच्या मदतीने सरकार बनवले. मुख्यमंत्रिपदाची हौस ठाकरेंनी भागवून घेतली. मात्र, हे सरकार अडीच वर्षांतच गडगडले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात ४० आमदार शिवसेना फोडून बाहेर पडले. उद्धव ठाकरे आता एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांना गद्दार म्हणतात. पण मग त्यांनी युतीत निवडणूक लढवून शरद पवारांसोबत जे केले, ती गद्दारी नव्हती काय? भाजपालाच रोखायचे होते तर २०१४ मध्येही महाविकास आघाडी होऊ शकली असती. इकडून तिकडून जुगाड करून आघाडीचे सरकार आणता आले असते. भरवसा नाही, विश्वासार्हता नाही ती मंडळी काहीही करू शकते. नावाला महाआघाडीचे सरकार होते. मात्र, शरद पवारांना ती किती दिवस चालवायचे होते, हा प्रश्नच असावा. शरद पवार आणि पृथ्वीराज पाटील यांच्यात ३६ चा आकडा आहे. पृथ्वीराजबाबांना विधानसभा अध्यक्ष व्हायचे होते. पवारांनी ते होऊ दिले नाही. विधानसभा अध्यक्ष असता तर शिंदेंच्या बंडानंतरही एवढ्या सहजपणे सरकार पडले नसते. आता तर महायुतीच्या राज्यातही विरोधी नेता नाही. शरद पवारांनी खुटी मारली आहे.

उद्धव ठाकरे हे शरद पवारांच्या जाळ्यात अडकले तेव्हाच त्यांचा गेम झाला होता. पवारांसोबत गेले ते बुडाले, हा इतिहास आहे. उद्धव यांना कळत नसेल अशातला भाग नाही. कळते पण वळत नाही. आता तर ते एवढे अडकले आहेत की निसटूही शकत नाही. कारण निसटले तरी भवितव्य नाही. उद्धव यांच्याकडे आता उरले आहे तरी काय? पक्ष गेला, चिन्ह गेले. फक्त २० आमदार हाताशी आहेत. त्यांच्या जोरावर काहीही होऊ शकत नाही. उद्धव यांनी स्वतःहून हे संकट ओढवून घेतले आहे. शरद पवार आणि काँग्रेसच्या मदतीने आपण बाजी पलटवू अशा हवेत ते होते. त्या जोरावर ते देवेंद्र फडणवीस यांना नको नको ते बोलत गेले. 'फडतूस', 'कलंक' एवढेच नाही तर 'तू राहशील नाहीतर मी राहीन' अशी भाषाही त्यांनी केली. कोण राहिलं आणि कोण फिटलं ते जनता पाहते आहे. या टोमणेबाजीने त्यांनी स्वतःला हास्यास्पद करून ठेवले. आता सर्वस्व गमावूनही टोमणे मारण्याची त्यांची खोड जात नाही. पण परवा फडणवीस यांनी त्यांना जो टोमणा मारला तो त्यांच्या चांगलाच जिव्हारी लागला असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी गुढीपाडव्याला संघ मुख्यालयात येऊन गेले. त्यावरून ठाकरे सेनेचा 'भोंगा' म्हणजे खासदार संजय राऊत यांनी फुकट अकलेचे तारे तोडले. राऊत यांचा दावा खोडताना फडणवीस जे बोलले त्याबद्दल त्यांना मानलं पाहिजे. अशीच घडामोड काँग्रेसमध्ये झाली असती तर काही वेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या असत्या. पण फडणवीस जे बोलले त्याबद्दल महाराष्ट्रानेच नव्हे तर देशाने ऋणी राहिले पाहिजे. कारण अलिकडे असे बोल ऐकू येत नाहीत. 'वडील जिवंत असताना उत्तराधिकारी शोधणे ही आमची परंपरा नाही. ही मुगल संस्कृती आहे' असे फडणवीस म्हणाले. यातला 'मुघल संस्कृती' हा टोमणा उद्धव यांना आयुष्यभर टोचत राहील. सध्या औरंगजेबाची कबर चर्चेत आहे. सत्तेसाठी औरंगजेबाने शहाजहान या आपल्या वडिलांना तुरुंगात डांबले, भावांना संपवले. उद्धव आपल्या वडिलांशी कसे वागले ते महाराष्ट्र जाणतो. १९९९ च्या निवडणुकीनंतर वयोमानानुसार बाळासाहेब हळूहळू बाजूला झाले होते. मात्र, बाळासाहेबांचा वारसा घेण्यासाठी उद्धव यांना कमालीची घाई. कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी अभिषेक करून घेतला. त्यासाठी राज ठाकरे यांना त्यांचे नाव सुचवावे लागले होते. 'ती माझी मोठी चूक होती' असे राज ठाकरेंनी पुढे एका जागी म्हटले आहे. राज ठाकरे, नारायण राणे हे बाळासाहेबांचे सोबती. मात्र उद्धव यांच्या वागण्यामुळे त्यांना वेगळा रस्ता पकडावा लागला. बाळासाहेबांच्या हयातीतच उद्धव शिवसेना चालवायला लागले होते. फडणवीस यांनी ज्या 'मुघल' संस्कृतीचा उल्लेख केला त्याचा रोख कोणाला उद्देशून होता, हे आता लक्षात येईल. फाजील महत्त्वाकांक्षेने उद्धव यांनी स्वतःचे काय हाल करून घेतले ते दिसते आहे. आज शरद पवार थकले, वय झालं. उद्धव यांना अजून वय आहे, पण विश्वासार्हता नाही. मग ते कुठल्या कामाचे? एका शिवसेनेच्या त्यांनी तीन शिवसेना केल्या. मराठी माणसांच्या मतांच्या तीन वाटण्या होत आहेत. मुंबई महापालिका जिंकणे तर सोडा; आता साधी ग्राम पंचायत घेतानाही उद्धव सेनेला घाम फुटेल. फडणवीसांशी पंगा घेऊन उद्धवांनी शेवटी काय मिळवले? आपले हिंदुत्व शेंडीजानव्याचे नाही असे उद्धव म्हणतात. मग वक्फ दुरुस्ती विधेयकावर त्यांचे कुठे हिंदुत्व आहे?

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### नवीन पिढीच्या निर्णयांवर नेहमीच प्रश्न का?

अपत्य नको या विषयावरील निर्मला गांधी यांचे वाचक पत्र वाचले. पत्रात उपस्थित केलेले मुद्दे चुकीचे आहेत, असे नाही. पण त्यामागे बघण्याचा दृष्टिकोन एकतर्फी आहे. या निर्णयावर मुळात आजची पिढी का येते आहे, हे जाणून घ्यायचा प्रयत्न अनुभवी पिढीने करायला हवा. पहिले तर घराचे अगदी गोकुळ करणे, अनेक अपत्ये असणे ही बाब अतिशय खर्चिक झाली आहे. या समस्येचे निवारण मोठ्या पातळीवर करण्याचा विचार व्हायला हवा. आजची पिढी यावर विचार करते आहे. त्यानुसार पाल्याला शिक्षण कसे द्यावे इथपासून सगळा विचार केला जातो. त्या विचारात समतोल येईपर्यंत अपत्य होऊ द्यावी का नको, यावर वेगवेगळे निर्णय समोर येणारच. महागाईमुळे समोर येणारी दुसरी बाब म्हणजे दाम्पत्यातील दोघांनी नोकरी करणे आणि संसारातील कामे दोघांनी करणे. ही बाब बहुतांश अनुभवी पिढीने मान्य केली असली, तरी ती अंमलात आणू बघताना कुठेतरी गल्लत होते आहे. अजूनही गोष्टींना स्त्रीवादी आणि पुरुषवादी भेदाने बघितले जातेच. नोकरी केल्याने स्त्री सशक्त होते वगैरे हा मुद्दा वेगळाच, पण मुळात आज जोडप्यातील दोघांनीही कमावते असणे आणि संसार सोबत चालवणे ही गरज झाली आहे. हे सगळं सांभाळताना मूळ गावापासून, घरापासून, कित्येकदा देशापासून त्यांना दूर जावे लागते. या सगळ्यात समतोल साधताना होऊ घातलेल्या अपत्याची फरफट होऊ नये म्हणून जर नवी पिढी काही निर्णय घेत असतील, तर त्यांना सर्रास चूक ठरवणे हे कितपत योग्य आहे? जे तरुण आज २८-३८ या वयोगटात आहेत, ते येणाऱ्या अफाट बदलांमुळे अनेक मानसिक समस्यांसोबत झुंज देत आहेत. याकडे देखील अनुभवी पिढीने लक्ष द्यावे.

**रोहन बेनोडेकर**/९८६०९३४५१७

●● ●●

### कार्यकर्ता घडविणारा नेता हवा

राजकारणात यशस्वी होण्यासाठी केवळ नेतृत्वगुण असणे पुरेसे नाही, तर खऱ्या अर्थाने जनतेच्या मनात स्थान मिळविणारा नेता कार्यकर्त्यांची फळी उभी करू शकतो. आजच्या राजकीय परिस्थितीत अशी नेतृत्व शैली दुर्मिळ होत चालली आहे. निवडणुकीच्या तोंडावर मोठ्या प्रमाणावर पक्षांतर किंवा स्वार्थासाठी नेतेगिरी करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित होत आहे. कार्यकर्ता घडविणारा नेता हा केवळ प्रचारापुरता कार्यकर्त्यांवर प्रेम करीत नाही, तर त्यांना संघटनात्मक शिक्षण देतो, राजकीय मूल्ये रुजवतो आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवतो. अशा नेत्याकडे असलेले महत्त्वाचे गुण म्हणजे संघटन कौशल्य. कार्यकर्त्यांचे विचार आणि ऊर्जेला योग्य दिशा देणे. दूरदृष्टी राजकारण केवळ सत्तेसाठी नव्हे, तर समाजसेवेचे साधन आहे हे पटवून देणे. केवळ आपल्या मतदारसंघापुरते मर्यादित न राहता, व्यापक स्तरावर प्रभाव टाकणे. नवे कार्यकर्ते तयार करताना त्यांना योग्य विचार, ध्येय आणि नीतिमत्ता शिकवणे. आजच्या तरुणांना राजकारणात आकर्षण वाटत असले, तरी त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. परिणामी अनेक जण राजकारणाकडे फक्त व्यक्तिगत फायद्याच्या दृष्टिकोनातून पाहतात. त्यामुळे कार्यकर्ता घडविणारा नेता असणे अत्यावश्यक आहे. तोच पुढच्या पिढीला समाजसेवेच्या माध्यमातून खरे नेतृत्व कसे करायचे हे शिकवू शकतो. राजकीय वातावरण कितीही बदलले तरी जनतेच्या मनात टिकणारा नेता तोच असतो जो कार्यकर्त्यांना घडवतो. राजकीय पक्षांनी निवडणुकीच्या तोंडावर मोठ्या फडतूस गर्दीवर अवलंबून राहण्याऐवजी, कार्यकर्ता घडविणाऱ्या नेत्यांना महत्त्व द्यायला हवे. कारण सशक्त नेतृत्व हीच राजकारणाची खरी ताकद असते.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

●● ●●

### आता न्याय कुठे मागायचा?

'समजुतीच्या वर्मावर बोट' हा अग्रलेख वाचला. आता सर्वसामान्य जनतेने न्यायदेवतेकडे कोणत्या नजरेने पाहायचे. जो विश्वास निर्माण केला होता तो आता धुळीस मिळाला आहे. दिल्ली उच्च न्यायालयातील वरिष्ठ न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या ल्युटेन्स बंगल्यात सापडलेल्या नोटा आगीच्या भक्ष्यस्थानी सापडल्या. या बेहिशेबी नोटांचा हिशेब कोण देणार? त्यानंतर या नोटा आमच्या नाहीत, कोणीतरी कुभांड रचले असा युक्तिवाद करीत बाजू सावरत आहेत. त्यांच्यावर कारवाई करायची सोडून केवळ बदली करण्यात आली. हे इतरांना काय न्याय देणार ? याआधीही विविध भानगडीत त्यांच्यावर आरोप करण्यात आले होते. त्यातून ते सहीसलामत बाहेर पडले. आता मात्र त्यांची केविलवाणी धडपड दिसून येत आहे. न्याय कुठे आहे? असाच सवाल सर्वसामान्य जनता करीत आहे. आता यापूर्वी त्यांनी दिलेले निकाल कोणत्या चौकटीत बसत आहेत. खरोखरच न्याय दिला की चालढकल केली, याचाही यानिमित्ताने अभ्यास करायला हवा. न्यायाधीश असे भ्रष्टाचारात अडकले तर सर्वसामान्य जनतेने न्याय कुठे मागायचा? शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये याचा प्रत्यय दिसून आला आहे.

**संतोष राऊत**/९९६०१०४३४५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## काळेगाव येथे अखंड हरिनाम व रामकथा पारायण उद्यापासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.४ एप्रिल -**

काळेगाव येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पंढरीरायाच्या कृपेने व श्रीसंत सद्गुरू शिवराम बुवा महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व हभप. आप्पासाहेब महाराज दिंडेगावकर व हभप.विठ्ठल महाराज दिंडेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि. ६ एप्रिल ते शनिवार दि.१२ एप्रिल या कालावधीत श्री.ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व रामकथा सोहळा संपन्न होणार आहे.

परिसरातील रामभक्त भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन काळेगाव ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे. या पारायणाच्या व्यासपीठ अधिष्ठानपदी हभप. विकास पाटील महाराज काळेगावकर हे आहेत.

या सात दिवसातील दैनंदिन कार्यक्रम कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा आरती , सकाळी ६ ते ७ माऊलीची महापूजा , सकाळी ७ ते १२ ज्ञानेश्वरी पारायण , दुपारी १२ ते १ तुकाराम गाथा, दुपारी १ ते २:३० महिला भजनी मंडळ काळेगाव, सायंकाळी ३ ते ५ रामकथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ हनुमान भजनी मंडळ काळेगाव, रात्री ७ ते ९ भोजन, रात्री ९ ते ११ किर्तन, रात्री ११ ते पहाटे ४ हरिजागर अशा पद्धतीने दैनंदिन कार्यक्रम असून या पारायण सोहळ्यात हभ.प.डॉ.मुंढे महाराज अणदूर, हभप. शिवाजी महाराज चव्हाण चव्हाणवाडी, हभप. बाबा चौरे महाराज खंडाळा, हभप.शिवाजी जाधव महाराज बावकरवाडी, हभप.औदुंबर खलाटे महाराज चव्हाणवाडी, हभप.लिंबराज चव्हाण महाराज कास्ती यांची कीर्तनाची सेवा होणार आहे. हभप. आप्पासाहेब महाराज दिंडेगावकर यांचे काल्याचे किर्तन व काला वाटप करण्यात येणार आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### भुसणी येथे कृषी संजीवनी प्रकल्पाची जनजागृती फेरी

**उमरगा, दि.४ एप्रिल -**

भुसणी (ता. उमरगा) येथे महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत गावस्तरीय हवामान अनुकूल सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करण्यासाठी पाच दिवसांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत विविध उपक्रम द्वारे प्रकल्पाची ओळख व उपयुक्तता याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी ग्राम कृषी विकास समिती व जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थी, शिक्षक, गावातील भजनी मंडळ यांच्या सहभागातून प्रभातफेरी काढण्यात आली. तसेच गाव नकाशा तयार करण्यात आला. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी महादेव असलकर, प्रकल्प विशेषज्ञ जोशी, तालुका कृषी अधिकारी डी. बी. रितापुरे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.या प्रसंगी मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, ग्रामपंचायत अधिकारी, महसूल अधिकारी, महिला बचत गट प्रतिनिधी, स्वयंसेवक, गावातील पदाधिकारी आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सलग पाच दिवस विविध उपक्रमांद्वारे या प्रकल्पाची माहिती गावकऱ्यांना देण्यात येणार आहे.



### कावडींचे शिखर शिंगणापूरकडे प्रस्थान

**तुळजापूर, दि.४ एप्रिल -**

तालुक्यातील श्रीक्षेत्र खंडाळा या गावाला एक प्राचीन परंपरा आहे. या गावची खंडाळा ते शिखर शिंगणापूर ही कावड पदयात्रा शिवकालीन परंपरा म्हणून ओळखली जाते. ३५० वर्षापूर्वीच्या शिवकाळात सुरु झालेली कावड पदयात्रा आजही अखंडपणे सुरु आहे. शिवकालिन परंपरा असलेल्या मानाच्या कावडींचे आज आई तुळजाभवानी मंदिरामध्ये आगमन झाले. परंपरेनुसार खंडाळा येथील मानाच्या कावडी आई श्री तुळजाभवानी मंदिराकडून शिखर शिंघणापुरच्या शंभुमहादेवाला मानाचा आहेर (शेला-पागोटे-धोतर) आहेर म्हणुन नेत असतात.. त्यासाठी आज श्री तुळजाभवानी मंदिरामध्ये मंदिर प्रशासनाकडून शंभुमहादेवाकरीता मानाच्या कावडींकडे सदरचा आहेर सुपुर्द करण्यात आला. यावेळी मंदिराचे धार्मिक व्यवस्थापक अधिकारी श्री भोसले साहेब, देविचे मुख्य पुजारी श्री धनंजय पाटील तसेच कावडीचे मानकरी व खंडाळा गावचे ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### आयटी फोरम, वॉलपेपरचे उद्घाटन

**धाराशिव, दि.४ एप्रिल -**

तेरणा महाविद्यालय येथे प्राचार्य डॉ.अशोक घोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयटी फोरमचे व वॉलपेपरचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डव्हान्स कॉलेजचे प्राचार्य सुरेश टकले उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता व त्याचा दैनंदिन जीवनात कसा वापर करावा याविषयी मार्गदर्शन केले. तसेच चॅट जीपीटी संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुनील पाटील तसेच डॉ. दीपिका देशमुख प्रा.जयंत कांचनबटवे, प्रा.उत्तरेश्वर तवले, प्रा.विजयकुमार साळुंके, प्रा.अर्चना तवले, प्रा.रोहिणी माने या उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुस्लिम सेवा संघाच्या तालुकाध्यक्षपदी तांबोळी

**मंगरुळ, दि.४ एप्रिल -**



मुस्लिम सेवा संघाच्या तुळजापूर तालुकाध्यक्षपदी मकबूल अलाउद्दीन तांबोळी यांची निवड करण्यात आली आहे मुस्लिम सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष फिरोज मासुलदार यांनी नियुक्ती पत्र पाठवून सदरची निवड जाहीर केली आहे तण मन धन लावून सत्यनिष्ठतेने संघटना वाढीसाठी काम करावे व मुस्लिम बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील रहावे अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांना संघटनेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. मकबूल तांबोळी यांनी यापूर्वीही अनेक संघटना यांची धुरा यशस्वीरित्या सांभाळली असून वेळप्रसंगी तीव्र आंदोलनही केले आहे व अनेक ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडली आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन मुस्लिम सेवा संघाने सदरची निवड जाहीर केली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल तुळजापूर तालुक्यातुन अभिनंदन केले आहे.

# भूकंप पुनर्वसित गावात वनीकरणाची कामे हाती घ्या

**संभाव्य टंचाईग्रस्त गावांसाठी पाण्याचे नियोजन करा... उपसभापती प्रा.डॉ.नीलमताई गोऱ्हे यांचे आढावा बैठकीत प्रशासनाला निर्देश...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ एप्रिल -**

भूकंपाने बाधित झालेल्या उमरगा व लोहारा तालुक्यातील पुनर्वसन करण्यात आलेल्या ३८ गावात व परिसरात मोठ्या प्रमाणात वनीकरणाचे कामे हाती घ्यावीत व जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईग्रस्त गावांना उन्हाळ्याच्या दिवसात टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी आतापासूनच नियोजन करावे. असे निर्देश विधानपरिषद उपसभापती प्रा.डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यंत्रणांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज जिल्ह्यातील भूकंपग्रस्त भागात सामाजिक वनीकरण करणे,जिल्ह्यात टंचाईच्या दिवसात पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे,जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था आणि अमली पदार्थ विरोधी कार्यक्रम व ऊसतोड महिला कामगार योजनांचा आढावा घेताना डॉ.श्रीमती गोऱ्हे बोलत होत्या.

यावेळी पोलीस अधीक्षक संजय जाधव, प्रभारी अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रा. डॉ.गोऱ्हे म्हणाल्या की, ज्या ३८ भूकंप बाधित गावांचे पुनर्वसन करण्यात आले आहे, त्या गावांमध्ये स्वच्छतागृहे असल्याची खात्री करावी.या गावांमध्ये सामाजिक वनीकरण विभागाने स्मृती वने तयार करावी.

ज्या ९० हेक्टरवर वनीकरणाची कामे पूर्ण झाली,उर्वरित जमीनीवर देखील वनीकरणाची कामे हाती घ्यावीत.ज्या गावांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे त्या गावांमध्ये सुविधा निर्माण झालेल्या आहेत का ते बघावे.या गावांमध्ये स्मृतिवन तयार करण्याचे नियोजन करावे.यामध्ये ग्रामस्थांना वनीकरणाच्या कार्यक्रमात सहभागी करून घ्यावे असे त्या यावेळी म्हणाल्या.

जिल्ह्यातील ज्या १०३ गावांमध्ये मागील वर्षी उन्हाळ्याच्या दिवसात टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला, त्या गावांमध्ये यावर्षी पाणीटंचाईची स्थिती निर्माण होत असेल तर त्या गावांपर्यंत यंत्रणांनी पोहोचून टंचाई परिस्थितीची माहिती घ्यावी असे सांगून प्रा.डॉ.गोरे म्हणाल्या की, या गावाच्या ग्राम स्थांनी पाणीटंचाई उपायोजनाबाबत तालुका व जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. शहरी भागातील ज्या विहिरीच्या पाण्याचा उपयोग करण्यात येत नाही, त्या विहिरीचे खोलीकरण करून गाळ काढून पाण्याचा उपसा करून त्या विहिरी स्वच्छ करून पाण्याचे निर्जंतुकीकरण करून त्या विहिरींचे पाणी पिण्यासाठी उपयोगात आणण्याचे नियोजन करण्याचे निर्देश डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी दिले.

जिल्ह्यातील महिलांचे आत्महत्यांचे प्रमाण शून्यवर आले पाहिजे,त्यांच्यासाठी असलेल्या विविध योजनांची माहिती त्यांना द्यावी.त्यांचे समुपदेशन करण्यात यावे. तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांच्यामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याचे काम प्रशासनाने करावे.जिल्ह्यात एकही बालविवाह होणार नाही याबाबत यंत्रणांनी सतर्क राहून काम करावे.समुपदेशन तसेच महिलाविषयक कार्यक्रमांचे आयोजन करावे.असे प्रा डॉ.गोऱ्हे यांनी सांगितले.

यावेळी पोलीस अधीक्षक श्री.जाधव म्हणाले की,अमली पदार्थ विरोधी कार्यक्रम ातून लोकांना त्याचे दुष्परिणाम आणि गुन्हेगार म्हणून त्यामध्ये सापडले तर कोणती शिक्षा होते,याची जाणीव करून देण्यात येईल तसेच हरवलेल्या मुलींचा शोध घेण्यासाठी एक सेल तयार करण्यात आला असून त्या मागची कारणे शोधून हरवलेल्या मुलींचा शोध घेण्यात येत आहे.भूकंपाने बाधित पुनर्वसित गावात स्मृतीवन तयार करण्यात येऊन तेथील ग्रामस्थांच्या मागण्यांवर चर्चा करून प्रशासन त्या मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने काम करेल असे श्री.यादव यांनी सांगितले.

ऊसतोड कामगार महिलांची आरोग्य तपासणी नियमित करण्यात येत असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त अरवत यांनी दिली.गायरान जमिनीवर चारा लागवड करण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती डॉ. पुजारी यांनी दिली. जिल्ह्यात मागील वर्षी १७ बालविवाह रोखण्यात आल्याचे श्री.गोरे यांनी सांगितले. सध्या जिल्ह्यात पाणीटंचाईबाबत गावांकडून प्रस्ताव प्राप्त झाले नसल्याचे श्री.सरवदे यांनी सांगितले. जिल्ह्यात भूकंप बाधित ज्यांचे पुनर्वसन झालेले आहे असे अ वर्गवारीचे उमरगा तालुक्यातील १० आणि ब वर्गवारीची १६ अशी २६ आणि लोहारा तालुक्यातील अ वर्गवारीची ९ आणि ब वर्गवारीची ३ अशी एकूण १२ गावे तर दोन्ही तालुका मिळून ३८ गावे असल्याची माहिती जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्रीमती गायकवाड यांनी दिली.

या सभेला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.चाकूरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक गणेश बारगजे, विभागीय वन अधिकारी बाळ पोळ व करे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम गोडभरले, सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोनाळे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मोहन सरवदे, प्रभारी जिल्हा महिला बालविकास अधिकारी किशोर गोरे यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.

## जिल्हा आरोग्य विभाग ६ राज्यस्तरीय पुरस्काराने होणार सन्मानित

**७ एप्रिल रोजी होणार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ एप्रिल -**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त ७ एप्रिल २०२५ रोजी मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कार्यक्रमात जिल्ह्याला सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल सर्वाधिक ६ पुरस्कार मिळणार आहेत.या कार्यक्रमाला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच सार्वजनिक आरोग्य मंत्री उपस्थित राहणार आहेत.

जिल्ह्याने सातत्याने उत्तम आरोग्य सेवा आणि राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांत उल्लेखनीय योगदान दिल्यामुळे खालील ६ पुरस्कार पटकावले आहेत.यामध्ये बालमृत्यू कमी करणारा जिल्हा-प्रथम पुरस्कार (RCH कार्यक्रमांतर्गत ५ वर्षांचा सातत्यपूर्ण प्रयत्न), जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यक्षमता मूल्यांकन-द्वितीय पुरस्कार (DHO Ranking २०२४-२५), राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम-द्वितीय पुरस्कार (८४.७५ टक्के गुणांसह उत्कृष्ट कामगिरी),गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम-द्वितीय पुरस्कार (१० प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय प्रमाणपत्र), राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम - द्वितीय पुरस्कार (९४ टक्के मोतीबिंदू शस्त्रक्रिया उद्दिष्ट पूर्ण), सर्वाधिक रुग्णालयीन प्रसूती करणारे शासकीय रुग्णालय-द्वितीय पुरस्कार (ग्रामीण रुग्णालय सास्तूर-१२८८ प्रसूती). या उल्लेखनीय यशाचे श्रेय जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.एस.एल.हरिदास आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत संपूर्ण आरोग्य यंत्रणेला दिले जाते.

या पुरस्कारांमुळे जिल्ह्याने संपूर्ण राज्यात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमध्ये आपली विशेष ओळख निर्माण केली आहे, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.एस.एल. हरिदास यांनी कळविले आहे.

## सोलापूर-लोहारा बससेवा सुरळीत करा; दिंडेगावकरांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.४ एप्रिल -**

सोलापूर-लोहारा एसटी बस सुरळीत व्हावी यासाठी तुळजापुर तालुक्यातील दिंडेगाव येथील ग्रामपंचायतीच्या वतीने वाहतूक नियंत्रक सोलापूर यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे तसेच ही गाडी लोहारा या ठिकाणी मुक्कामी न ठेवता बसवंतवाडी येथे मुक्कामी ठेवावी व ही गाडी लवकरात लवकर सुरळीत करावी, ही बस सेवा सुरु करावी अन्यथा वरिष्ठाकडे तक्रार करण्याचा इशाराही यात देण्यात आला आहे.

या निवेदनावर दिंडेगाव ग्रामस्थासह आरळी बु. काळेगाव येथील ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अवकाळी पावसाचा फटका शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.४ एप्रिल -**

वाशी तालुक्यात दि.३ एप्रिल रोजी रात्री अचानक आलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्याचं मोठं नुकसान केलं आहे. रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, कांदा पिकांना पावसाचा चांगलाच फटका बसला आहे.



अतिवृष्टीतून शेतकरी कसाबसा सावरत असताना आता अवकाळी पावसाचं संकट आलं आहे. बहुतांश शेतकऱ्यांनी ज्वारी काढून टाकली आहे. पण अचानक आलेल्या अवकाळी पावसानं कणसं मातीत मिळसली आहेत. त्यामुळे बाजारात ज्वारी पिकाला कमी दर मिळण्याची शक्यता आहे. वादळी वाऱ्यामुळे आंब्याची मोठी नुकसान झाली असून झाडाखाली आंब्याची पसरंड पडली आहे. तर दुसरीकडे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी कांदा काढणी करून शेतात ढिगारे लावून ठेवले होते. अचानक झालेल्या पावसाने ढिगाऱ्याखाली पाणी शिरल्याने कांदा सडून जाण्याची शक्यता आहे. झालेल्या नुकसानीची शासनाने तात्काळ पाहणी करून नुकसान भरपाई द्यावी, अशी तालुक्यातील शेतकऱ्यांची मागणी आहे.

## श्री क्षेत्र रामतीर्थ येथे चैत्र नवरात्री महोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ एप्रिल -**



नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र राम तीर्थ येथे दि. ३० मार्चपासुन चैत्र नवरात्री महोत्सव साजरा करण्यात येत असुन यावेळी घटस्थापना करण्याबरोबरच दररोज दुर्गा सरस्वती पाठाचे वाचन करण्यात येत आहे. हा उत्सव दि. ६ एप्रिलपर्यंत म्हणजे श्री राम जन्मोत्सवापर्यंत चालणार आहे.

नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र रामतीर्थ हे प्रभु श्री रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेले श्रीक्षेत्र आहे.याठिकाणी दरवर्षी श्रीराम जन्मोत्सव सोहळा, हनुमान जन्मोत्सव सोहळा, महाशिवरात्री यासह विविध उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरे केले जातात. यावर्षी दि, ६ एप्रिल रोजी श्रीराम जन्मोत्सव सोहळा, १२ एप्रिल रोजी, हनुमान जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे. हे सर्व उत्सव श्रीक्षेत्र रामतीर्थचे प्रमुख महंत श्री विष्णु शर्मा महाराज यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली साजरे केले जाणार आहेत.

श्रीराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पालखी मिरवणुकीसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे दि.३० मार्चपासुन चैत्र नवरात्र महोत्सवास प्रारंभ करण्यात आला आहे.

## नंदगावात अवैध धंदे तेजीत; ग्रामपंचातीचा अमरण उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ एप्रिल -**

नंदगाव ता. तुळजापुर येथे खुलेआम सुरु असलेले सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करावे अन्यथा याविरोधात धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अमरण उपोषणास बसण्याचा इशारा नंदगाव ग्राम पंचायतीच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

नंदगाव येथे सध्या बसस्टॉप तसेच गावात इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरु आहेत. यामध्ये विनपरवाना दारू विक्री, जिल्हा परिषद प्रशाला शाळेच्या गेटसमोर मटका तसेच ऑनलाईन चक्री जुगार सुरु आहे याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होत आहे. या व्यसनाच्या आहारी जाऊन गावांतील ३५ ते ४० वयोगटातील तरुण मुले मृत्युमुखी पडले आहेत. यामुळे अनेकांची कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. सध्या गावात सुरु असलेले सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करावेत अन्यथा या विरोधात नंदगाव ग्रामपंचायत व समस्त ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अमरण उपोषणास बसण्याचा इशारा जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.या निवेदनावर सरपंच महादेवी चिनगुंडे, माजी सरपंच राधिका घंटे, ग्रामपंचायत सदस्या रेणुका गुड्डे, कोमलबाई काटे, मीनाक्षी मोरे, राधिका कांबळे, नंदाबाई कामशेट्टी, शशिकांत नागिले, धनराज कामशेट्टी, विरसंगप्पा जमादार, तुळजापुर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सिद्धेश्वर कोरे, विश्वजीत घंटे, सतीश काटे, संतोष कांबळे, जयप्रकाश करंडे, हिरालाल वाले व परमेश्वर चिनगुंडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# आत्महत्याग्रस्त कुंटूबांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासह स्वत:च्या कुंटूबाप्रमाणे सांभाळणार

**शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड.निलेश हेलोंडे**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ एप्रिल -**

जिल्ह्यातील अनेक शेतकरी कुटूंबातील कर्ता पुरुष गेल्याने संसाराचा कणा मोडला आहे.त्यांचा आधार नसल्याने ती कुटूंबे विवंचनेत जगत आहेत,अशा कुटूंबाच्या मागे शासन खंबीरपणे उभे राहून त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासह स्वतःच्या कुटूंबाप्रमाणे सांभाळणार असल्याचे मत कै.वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड.निलेश हेलोंडे-पाटील यांनी व्यक्त केले.



धाराशिव जिल्ह्याच्या दौर्यावर आले असता त्यांनी तुळजापूर तालुक्यातील आरळी बु.आणि धाराशिव तालुक्यातील शिंगोली येथील आत्महत्या शेतकरी कुटुंबास भेट दिली, त्यावेळी व्यक्त केले.

या भेटीदरम्यान धाराशिव तहसीलदार डॉ.मृणाल जाधव, तुळजापूर तहसीलदार अरविंद बोळंगे, प्रभारी महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे, सहायक गटविकास अधिकारी संजय ढाकणे, तालुका कृषी अधिकारी व तलाठी आदी उपस्थित होते.

श्री.हेलोंडे-पाटील म्हणाले की, शासन आत्महत्या शेतकरी कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहे. आत्महत्याग्रस्त कुटूंबाची प्रत्येक गरज शासकीय योजनांच्या माध्यमातून भागविण्याचा प्रयत्न करण्यात येईल तसेच त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठीही मदत करण्यात येईल. अशा कुंटूंबातील अनाथ मुलांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेच्या माध्यमातून लाभ मिळवून द्यावा.

तसेच शेतकरी कुंटूबातील महिलेस ज्या व्यवसायाचे प्रशिक्षण हवे त्यांचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी. शासनाची प्रत्येक योजना ही अशा कुटूंबापर्यत पोहचविण्याचा प्रयत्न करुन देण्यात यावा अशा सुचनाही त्यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

शासनाच्या विविध योजनेतून सुरु असलेली रुग्णालये याची माहिती प्रत्येक ग्रामपंचायतीच्या प्रवेशद्वारावर चिकटवण्यात यावीत,असेही त्यांनी सांगितले.आत्महत्याग्रस्त कुटूंबाच्या संवेदना सर्व शासकीय अधिकारी यांनी जाणून घेवून काम करण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या. यावेळी ॲड.हेलोंडे यांच्या आरळी बु.आणि शिंगोली गावात भेटदरम्यान ग्रामस्थ उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अध्यात्मिक विचारधारा ही सामाजिक कल्याणाच्या कार्यात कार्यक्षम

## कनकेश्वरी देवी यांनी मांडले रामकथेतून दिला भाविकांना संदेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**

श्री राम म्हणजे सर्वव्यापी असलेले लोकप्रिय व्यक्तिमत्व आहे. नेहमी सर्वांच्या आनंदासाठी काम करणार्या व्यक्तीला प्रत्येकजण आनंदाने शुभेच्छा देतो. ज्याने कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात एक आदर्श व्यक्तिमत्व निर्माण केले आहे त्याला देव जागतिक स्तरावर काम करण्याची क्षमता देतो. रामकथा केवळ रामाला त्यांच्या व्यक्तिमत्त्वात स्थापित करण्यासाठी आहे. केवळ आध्यात्मिक विचारधारा म्हणजे सामाजिक कल्याणाच्या कार्यात कार्यक्षम किंवा शक्तिशाली असलेली विचारधारा होय असे मार्गदर्शन महामंडळेश्वर माँ कनकेश्वरी देवीजी यांनी पाचव्या दिवशी श्रीराम कथा ज्ञानयज्ञात केले.

श्रीराम कथा ज्ञान यज्ञ मागील पाच दिवसापासुन हिंगोली येथील मंगळवारा भागातील दत्तमंदिर परिसरात सुरु आहे. श्रीराम कथा ज्ञान यज्ञात महामंडलेश्वर प.पू.माँ कनकेश्वरी देवीजी यांच्या मधुर वाणीतुन कथा सुरु आहे. यावेळी माँ कनकेश्वरी देवीजी म्हणाल्या की, भगवान रामाचा अनुभव प्रत्येकासाठी नसला तरी रामाच्या कृपेची अनुभव प्रत्येकासाठी असतो. दिव्य विचारधारा सिद्ध करण्यासाठी देवाचे प्रकटीकरण आहे. जेव्हा तुम्ही चांगली कामे करता, तेव्हा तुम्हाला देवाची कृपा जाणवते. आपल्याला चार पुरुषांचे (धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष) ज्ञान देण्यासाठी भगवान रामाचा जन्म झाला. गौ-सेवा हा संपूर्ण निसर्गाच्या सेवेचा प्रतिकात्मक प्रकार आहे. सनातनी परंपरेनुसार, मनुष्य हा जीवनाची सुरक्षा आणि समृद्धीचा आधार आहे. वैदिक कायदे आणि गुरुसेवा यांच्याद्वारेही कमकुवत नियतीला बळकटी मिळू शकते. सत्संग मनाचा विपर्यास होऊ देत नाही. सद्गुरुच्या कृपेमुळे शिष्याला चारही पुरुषार्थ प्राप्त होतात असे विचार माँ कनकेश्वरी देवीजी यांनी यावेळी व्यक्त केले.

माँ कनकेश्वरी देवीजी पुढे बोलतांना म्हणाल्या की, आसक्तीपासून मुक्ती हा दैवी शक्तीच्या प्राप्तीचा संदेश आहे. जेव्हा एखादा दैवी अवतार पंचमहाभूतांपैकी कोणत्याही व्यक्तीचे शरीर धारण करतो, तेव्हा पृथ्वीवर नक्कीच काहीतरी आश्चर्यकारक घटना घडणार हे निश्चत आहे. सिद्ध गुरूची कृपा प्राप्त करण्यासाठी, मुलाला बुद्धिमत्तेचे शुद्ध रूप बनले पाहिजे. सदुरु केवळ शिष्याचा विवेक उंचावूनच समाधानी होतात. संत आणि देवाचे बोलणे देखील आपले जीवन धन्य बनवते. देवाच्या अनंततेच्या अनुभवापासून वेगळे होणे म्हणजे दुःख भोगणे होय. पडल्यानंतर पुन्हा उठण्याचा प्रयत्न न करणे हे दुर्दैवी आहे असेही त्या म्हणाल्या. गुरुवार दि.३ एप्रिल रोजी दैनंदिन यजमान ओमप्रकाश मोहनलाल हेडा हे होते. तर महाप्रसादाचे यजमान सुधाकर भानुसाजी साकळे हे होते. श्री राम कथा ज्ञान यज्ञात पाचव्या दिवशी आ.तान्हाजी मुटकुळे यांनी कथा श्रवण करुन आरती केली. यावेळी हजारो भाविक भक्त उपस्थित होते. पाचव्या दिवशीची कथा संपन्न झाल्यानंतर दैनंदिन महाप्रसाद पार पडला.

# संजीवनी अभियान शिबीरात ६७ महिलांची तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात महिला स्वतःच्या आरोग्यकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे त्यांच्यामध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. याचा शोध घेण्यासाठी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून ८ मार्चपासून जिल्ह्यात विशेष संजीवनी मोहीम राबविण्यात येत आहे. आमदार तान्हाजी मुटकुळे यांच्या हस्ते प्राथमिक आरोग्य केंद्र गोरेगाव येथे नवसंजीवनी अभियानाचे तालुकास्तरीय उद्घाटन करण्यात आले. या तपासणी शिबिरात एकूण ६७ महिलांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी आठ महिलांची व्हीआयए टेस्ट पॉझिटिव्ह आली आहे.

यावेळी प्रमुख उपस्थिती मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंजली रमेश, सरपंच गंगुबाई कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग फोपसे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. कर्करोगाविषयी मनामध्ये भीती बाळगण्याचे कारण नाही. कारण आता यावर शस्त्रक्रियेच्या माध्यमातून उपचार करता येत आहेत. त्यामुळे रुग्णांनी वेळेत तपासणी करून घेतली पाहिजे. संजीवनी अभियानामध्ये आशा वर्कर यांनी सर्वेक्षणाचे काम उत्कृष्टपणे केले असल्याचे सांगत, खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील लाभार्थ्यांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार श्री. मुटकुळे यांनी केले.

याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश म्हणाल्या 'लवकर निदान, लवकर उपचार' तेव्हा महिलांनी समोर येऊन स्वतःहून तपासणी करून घेतली पाहिजे. त्यामुळे कर्करोगावर त्वरित मात करता येते. कर्करोगावर उपचार करणे आता सहज आणि अतिशय अल्पदरात करता येत आहेत. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस यांनी कर्करोगाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात संजीवनी अभियान राबविण्यात येत आहे. हिंगोली जिल्ह्यातील ३० वर्षावरील सर्व महिलांचे आशा स्वयंसेविकामार्फत घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात संशयित महिलांची डॉक्टरकडून आज तपासणी करण्यात आली. त्यांना स्त्रीरोग तज्ञांच्या देखरेखीखाली विशेष आरोग्य शिबिरातून ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय निदान करण्यात येणार आहे. तसेच निदान झालेल्या रुग्णांना उपचारासाठी संदर्भीत करून पाठपुरावा केला जाणार आहे.

यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सतीश रुणवाल, गटविकास अधिकारी माधव कोकाटे, डॉ. मंगेश टेहरे, डॉ. रवी पाटील, सुनील पाटील, डॉ. बालाजी भाकरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. वसंत पाटील, डॉ. कुणाल अवचाटे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी मारोतराव पोले, तालुका पर्यवेक्षक अशोक जोशी, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. माधव वानखेडे डॉ. विजय बोरकर डॉ. अजय जाधव, डॉ. हनुमान सावके, डॉ. दिपाली इंगोले डॉ. स्वाती मगर, डॉ. वैशाली बगाटे, डॉ. इंगळे, यांच्यासह कार्यक्षेत्रातील सर्व आशा वर्कर आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील संपूर्ण वैद्यकीय चमू उपस्थित होता. जिल्ह्यात जिल्हाधिकारी अभिनव गोयल आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी आरोग्य, शिक्षण आणि महिला बालकल्याण विभागामध्ये लक्ष घातले असून सर्वसामान्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा यासाठी भेटी देतांना दिसत आहेत.

# विद्यार्थी, प्रवाशी, चालक-वाहकांसाठी पाणपोई ठरली वरदान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**



येथील बस स्थानकात भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते नुकतेच थंड पिण्याच्या पाण्याची सोय करून देण्यासाठी पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. या पाणपोईचा लाभ बाहेरगावाहून ये-जा करणारे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच प्रवाशी आणि वाहक-चालकांना होत असून त्यांच्यामधून समाधान व्यक्त होत आहे.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे पिण्याच्या पाण्याची नितांत गरज आहे. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी बस स्थानकात थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यसाठी पाणपोई स्थापन केली आहे. या पाणपोईला लोखंडी जाळी आणि वरच्या बाजुला पत्रे लावण्यात आले आहेत. त्यात दोनशे लिटर क्षमतेचा वॉटर कुलर बसविण्यात आला असून पाणी पिण्यासाठी चार नळाची तोटी लावण्यात आली आहे. पाणी पिण्यासाठी स्टीलचे ग्लास व कुलरला विद्युत कनेक्शन लावून चोवीस तास थंड पाणी मिळण्याची सोय करण्यात आली आहे. याशिवाय वरील बाजूस पाच हजार लिटर पाण्याचे टँकर ठेवण्यात आले आहे. सदर पाणी तीन ते चार दिवसात संपत आहे. या पाणपोईचा फायदा बाहेरगावाहून ये-जा करणारे विद्यार्थी तसेच प्रवाशी आणि बस स्थानकातील चालक-वाहक यांना होत असून या पाणपोईमुळे त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.


## संक्षिप्त वृत्त

### सेवानिवृत्त पोलिसांच्यावतीने शिरखुरमा



हिंगोली- जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयाच्या जून्या इमारतीमधील सेवानिवृत्त पोलिस अधिकारी, पोलिस अंमलदार बहुउद्देशिय सेवाभावी सामाजिक संस्था हिंगोली कार्यालयात ३ एप्रिल गुरूवार रोजी रमजान ईद निमित्ताने शिरखुरम्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेकांनी शिरखुरम्याचा मनसोक्त आनंद घेऊन मुस्लिम बांधवांना रमजान ईद निमित्ताने शुभेच्छा दिल्या. या निमित्ताने जिल्हा पोलिस दलातील सेवानिवृत्त पोलिस अधिकारी, पोलिस अंमलदार बहुउद्देशिय सेवाभावी सामाजिक संस्था हिंगोली या कार्यालयात मुस्लिम समाजातील पोलिस अधिकारी व कर्मचार्यांनी रमजान ईद निमित्ताने शिरखुरम्याचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी शेख जमिरोद्दीन, शेख निजाम, कलंदर पठाण, शेख इलियास, बेग साहब, शेख इद्रिस, शेख सलिम सय्यद, सय्यर अथर, तय्यब अली, हिदायतुल्ला पठाण, उमर सय्यद, अश्रीमोद्दिन पठाण, मोईन शेख, शफी, शकील, करीम खाँ, आय्युब पठाण यांच्यासह मुस्लिम समाजातील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### शिरड शहापूरमध्ये अवैध धंद्यांना ऊत



शिरड शहापूर- औंढा नागनाथ तालुक्यातील शिरड शहापूर येथे अवैध धंदे जोमात सुरू आहेत. गावात जुगार, मटका तसेच चक्री, अवैध दारू विक्री, अवैध वाळू उपसा व वाहतुक खुलेआम सुरू असून संबंधित विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे. दिवसा गावात मटका, चक्री तसेच जुगार अड्डयांवर लोकांची गर्दी दिसत आहे. अवैध दारू विक्री आणि जुगार, मटक्यामुळे गोरगरीबांचे संसार उध्वस्त होत आहेत. काही दिवसांपूर्वी गावात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या अवैध धंद्यावर कार्यवाही केली परंतु दुसऱ्याच दिवशी हे धंदे पुन्हा पूर्ववत सुरू झाल्याचे दिसत आहे. अवैध धंद्यांमुळे गावात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होण्याची शक्यता आहे. अवैध धंदे बंद करण्याची मागणी गावकऱ्यांमधून होत आहे.

# फिजीक्सवाला कोचींग क्लासेसचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**

एन व्ही आर एज्युकेशन प्राइव्हेट लिमिटेडतर्फे हिंगोली शहरातील जवळा पळशी रोड पोदार इंटरनॅशनल शाळेजवळ श्री हंसराज एन्क्लेव्ह येथे फिजीक्स वालाच्यावतीने भव्य एज्यकेशन कॅम्पसचे उद्घाटन शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांचेहस्ते करण्यात आले.

हिंगोलीत प्रथमच फिजीक्सवाला कोचींग क्लासेसचे सुरू होणार आहेत. या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून जेईई तसेच नीट सहीत इयत्ता ८ ते १२ पर्यंत विद्यार्थ्यांचे कोचींग क्लासेस तसेच स्पर्धात्मक परीक्षा याबाबत मार्गदर्शन होणार आहे. या कोचींग क्लासेसचे दि ४ एप्रिल रोजी शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले यावेळी संचालक प्रकाश अग्रवाल, रितेश अग्रवाल, ॲड निकुंज अग्रवाल आदींची उपस्थिती होती.

# पोलिसांच्या ऑलआऊट ऑपरेशन कार्यवाहीत ८० ब्रास वाळूसाठा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**



जिल्हयातील अवैध वाळु वाहतुक व साठा याविरूध्द कठोर कार्यवाही करण्यासाठी पोलीस व महसुल विभागाचे संयक्तरित्या व स्वतंत्र पथक नेमुन वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते. तरी सदर कार्यवाही मध्ये आणखी तिव्रता वाढवुन वाळु वाहतुक करणारे व वाळु साठा करणा-या विरूध्द कठोर कार्यवाही करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिनांक ०२/०४/२०२५ ते ०३/०४/२०२५ रोजी मध्यरात्री अवैध वाळु कार्यवाही बाबत अचानकपणे ऑलआउट ऑपरेशन राबविले.

सदर ऑपरेशन मध्ये पोलीस अधीक्षक यांचे सह अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी अंबादास भुसारे, राजकुमारे केंद्रे, सुरेश दळवे यांचेसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनचे ठाणेदार, दुयम अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग घेतला होता.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सदर ऑपरेशनमध्ये जिल्हयातील सर्व वाळु घाटावर जावुन पाहणी करण्याच्या सुचना दिल्या. त्यावरून पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस स्टेशन अंतर्गत असणा-या सर्व वाळु घाटावर जाउन प्रत्यक्ष पाहणी केली तसेच पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्वतः पोस्टे सेनगाव अंतर्गत बन बरडा या परिसरात जाउन पाहणी केली, तसेच अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील यांनी हिंगोली शहरालगत असलेल्या महादेव वाडी, नर्सी कुटी या परिसरात जाउन पाहणी केली असता महादेव वाडी परिसरात ८० ब्रास (कि.अं. २० लक्ष रूपये) रेती साठा अवैधपणे नदी पात्रात साठवणुक केलेला आढळुन आला त्यावरून सदर अवैध रेती साठयावर कार्यवाही करण्याबाबत महसुल पथकाला पाचारण करून सदर रेती साठा जप्त करण्यात आला आहे. यानंतर सुध्दा वेळोवेळी पोलीस पथकाच्या वतीने जिल्हयातील अवैध वाळु वाहतुक व साठवणुक करणा-या विरुध्द कठोर कार्यवाही करण्यात येणार असुन सतत गुन्हे करणा-या विरूध्द एमपीडीए अंतर्गत व हददपार कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगीतले.

# श्री चंद्रेश्वर महादेव मंदिराचा वर्धापन दिन, कलशारोहन सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**

शहरातील रिसाला बाजार गवळीपुरा येथे श्री चंद्रेश्वर महादेव मंदिर वर्धापन दिन व कलशारोहनाचा कार्यक्रम आज दिनांक ३ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला होता.

सकाळपासूनच पुजाऱ्यांच्या हस्ते महादेवाची विधीवत पूजाअर्चा करण्यात आली. रिसाला बाजार भागात भव्य कलश यात्रा काढण्यात आली होती. यावेळी मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. दुपारी दोन वाजता कलशारोहन चा कार्यक्रम संपन्न झाला. कलशारोहनाचा कार्यक्रम झाल्यानंतर आलेल्या भावी भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. श्री चंद्रेश्वर महादेव मंदिर वर्धापन दिनानिमित्त चंदर भैय्या मित्र मंडळच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाचे आयोजन श्री कृष्ण मित्र मंडळ गवळीपुरा, साई माऊली मित्र मंडळ हिंगोलीच्या वतीने करण्यात आले होते. भाजपाचे राजू यादव, कैलास शहाणे, दीपक सेठी, शिवानंद आप्पा होकर्णे सागर यादव, पवन यादव, योगेश कांबळे, राहुल यादव, विशाल यादव, आकाश यादव, परशुराम धाबेकर, सचिन यादव, शुभम जोजार, दुर्गेश यादव, बापू यादव, रोहित यादव, पिंटू यादव, शुभम गवारे आदींनी परिश्रम घेतले.

# सेतू भू प्रणाम केंद्राचे उद्घाटन नाममात्र शुल्कात मिळणार दाखले



**हिंगोली, ४ एप्रिल–** उपअधीक्षक भूमी कार्यालय हिंगोली येथे सेतु भु प्रणाम केंद्राचे उद्घाटन जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख प्रशांत बिलोलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशान्वये तसेच जमावबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली दि ४ एप्रिल रोजी हिंगोली शहरातील उपअधीक्षक भूमी कार्यालय येथे सेतू भु -प्रमाण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. सेतु भु - प्रणाम केंद्राच्या अंतर्गत केंद्राच्या अंतर्गत विविध प्रकारचे कागदपत्र पत्रे, मिळकत पत्रिका फेरफार, नक्कल व मोजणी अर्ज नाममात्र शुल्कात भरल्या जातील. यावेळी उपअधीक्षक प्रमोद माळी, पिंपळगावकर, अभय कुलकर्णी, तमखाने, सूर्यवंशी, बाळासाहेब जगताप, हितेश राऊत, उमेश, राऊत अनिल, सुरुशे उगले, कराळे, अविनाश गोरे, सचिन ठाकरे, अशोक खोकले, जावेद, प्रतीक गोरे, महादेव वैरागड, संजय घुगे आदींची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पाणीटंचाई निवारणाची कामे तातडीने पूर्ण करा

## किनवट नगरपरिषदेच्या आढावा बैठकीत आ. केराम यांचे अधिकारी-कर्मचाऱ्यांना निर्देश

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.०४ एप्रिल**

आमदार भीमराव केराम यांच्या प्रमुख उपस्थितीत किनवट नगर परिषदेची पाणीटंचाई निवरणार्थ आढावा बैठक दि. २ एप्रिल रोजी नगरपरिषद कार्यालयातील मुख्याधिकारी यांच्या दालनात संपन्न झाली असून या बैठकीत आ. भीमराव केराम यांनी शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेतला तसेच नागरिकांना पाण्याची कमतरता भासू नये यासाठी १०० केवी क्षमतेचे नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे निर्देश विद्युत कार्यालयाला दिले आहेत. या बैठकीत एसबीआय किनवट शाखेसाठी नवीन जागा उपलब्ध करून देणे, कर वसुली



वाढविणे तसेच शहरातील मूलभूत सोयीसुविधाची कामे त्वरित करण्याच्या सूचना आ. केराम यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असून नागरिकांना पाणीटंचाईची समस्या जाणू नये यासाठी आमदार भीमराव केराम यांच्या प्रमुख उपस्थितीत किनवट नगरपरिषद कार्यालयात दि. २ एप्रिल रोजी पाणीटंचाई निवारणासह विविध विषयावर आढावा बैठक संपन्न झाली. बैठकीत पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी वितरण लाईनवर वोल्व बसविणे, नळांना तोट्या लावणे, नागझरी मध्यम प्रकल्प येथून होणारा पाणीपुरवठा कमी दाबाच्या विजपुरवठ्यामुळे सुरळीत होण्यास अडचण निर्माण होत असल्याचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर आमदार भीमराव केराम यांनी तात्काळ विद्युत कार्यालयाचे कनिष्ठ अभियंता मेश्राम यांना बैठकीत बोलावून ६३ केव्ही ट्रांसफार्मर ऐवजी १०० केवी क्षमतेचे ट्रांसफार्मर बसविण्याचे निर्देश दिले आहेत. एसबीआय किनवट शाखेचे मॅनेजर यांना बँकेचे कामकाजाकरिता नवीन जागा उपलब्ध करून देण्यासाठी विनंती केली असता आमदार महोदयांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ अजय कुरवाडे यांना बँकेच्या शाखेला जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या असता कुरवाडे यांनी ते मान्य केल्या. बैठकीत दिव्यांगासाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीचे वितरण करण्यात आले असून नगरपरिषदेच्या कर वसुलीचे उद्धीष्ट पूर्ण करून नागरिकांना मूलभूत सोयी सुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना आ. केराम यांनी दिल्या आहेत. कोलामखेडा व हमाल कॉलनी येथील पाईपलाईनची कामे तात्काळ मार्गी लावून पाणीपुरवठा सुरू करण्याची ताकीद आमदार भीमराव केराम यांनी संबंधित ठेकेदाराला दिली आहे. या आढावा बैठकीस माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार, भाजप नेते सुधाकर भोयर, माजी नगरसेवक नरेश श्रीमनवार, मधुकर अनेलवार, नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, नगर रचनाकार स्वानंद मामीलवाड, राहुल सातुरवार, राजू पिल्लेवार, लेखापाल चक्रपाणि कदम यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### राजुरा ग्रामपंचायत गैरव्यवहार प्रकरण

# माजी सैनिकाचा गणवेश धारण करून आत्मदहनाचा इशारा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०४ एप्रिल**

मुखेड तालुक्यातील मौजे राजुरा ग्रामपंचायत अंतर्गत वर्ष २०२० ते २०२४ दरम्यान पंधरावा वित्त आयोग सह कृषी विभाग आणि मत्स्य योजनेमध्ये सरपंच व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी संगणमत करीत सुमारे १०० कोटी रुपयाचा भ्रष्टाचार केला आहे. या भ्रष्टाचाराच्या चौकशी व कारवाईच्या मागणीसाठी माजी सैनिक राम इंगळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सोमवार दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी सैनिकी गणवेशांमध्ये आत्मदहनाचा इशारा दिला आहे.



मौजे राजुरा ग्रामपंचायत अंतर्गत मागील चार वर्षापासून आलेल्या ग्रामपंचायत अधिकारी व सरपंचांनी संगणमत करून पांढरा वित्त आयोग सिंचन विहीर मनरेगा गाय गोठा योजना, आयुष्यमान भारत योजना, बेटी बचाव योजना, दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना, जलजीवन मिशन, पशुधन योजना, राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम, आरो प्लांट तसेच महिला बाल विकास कार्यक्रमांतर्गत व मत्स योजना अनुदानात सुमारे ९८ कोटी रुपयाचा भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप माजी सैनिक राम तुकाराम इंगळे यांनी केला आहे. याबाबत वेळोवेळी पुरावे सादर करून संबंधितांवर कार कायदेशीर कारवाई करण्याची मागणी इंगळे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना केली होती. त्यासाठी पाठपुरावा करीत उपविभागीय अधिकारी देगलूर येथे आमरण उपोषण व त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर देखील दहा दिवस आमरण उपोषण केले आहे.

त्यांच्या उपोषणाची दखल घेत प्रशासकीय जिल्हा प्रशासनाने केवळ मोघम उत्तरे दिल्याने भ्रष्टाचाराला पाठिंबा देत असल्याचा संशय व्यक्त करीत माजी सैनिक राम इंगळे यांनी सोमवार दि. २१ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरामध्ये सैनिकाच्या गणवेशांमध्ये आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### भंते कश्यप ली यांच्या हस्ते प्रतिक शिंदे यांना समाजरत्न पुरस्कारफ

**मुदखेड**-तालुक्यातील दरेगाव येथील प्रतीक शिंदे यांना भंते कश्यप ली यांच्या हस्ते समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.प्रतिक शिंदे यांनी गेल्या आठ वर्षापासुन सामाजीक, आंबेडकरी चळवळीतील योगदान, तसेच भिम अर्मी संघटनेच्या माध्यमातुन अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम त्यांनी केलं आहे. भिम अर्मी संघटनेचे संस्थापक चंद्रशेखर आझाद यांच्या कर्तत्वावर विश्वास ठेवुन त्यांनी प्रत्येक गावातील तरुण भिम अर्मीशी जोडण्याचे काम केले आहे. त्यांनी केलेल्या कार्याबद्दल व निस्वार्थ समाज सेवा ओळखुन संयोजक आचार्य भंते कश्यप ली व मुकेश भाई निकाळजे यांनी प्रतिक शिंदे यांना समाजरत्न पुरस्कार जाहिर केला होता. दि.३० मार्च रोजी संयोजक आचार्य भंते कश्यप ली व मुकेश भाई निकाळजे मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यामानाने खरपुरी क्रिकेट मैदान जिल्हा जालना याठिकाणी पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातून १०० युवकांना समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये मुदखेड तालुक्यातील दरेगाव येथील प्रतिक शिंदे यांना आचार्य भंते कश्यप ली व मुकेश भाई निकाळजे यांच्या हस्ते समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प्रतिक शिंदे यांना समाजरत्न पुरस्कार मिळाल्या बद्दल जिल्हा व तालुक्यातुन भिम आर्मी पदाधिकारी, आझाद समाज पार्टी पदाधिकारी,व मित्रमंडळ यांच्या वतीने विविध माध्यमातुन अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव करण्यात येत आहे.



### युवा नेते बंटी लांडगे यांना राजकीय क्षेत्रातील युथ आयकॉन पुरस्कार

**नांदेड**-राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष बंटी लांडगे हे विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून जनसेवेत तत्पर असतात, त्यांच्या या कार्याबद्दल माजी राज्यमंत्री माधवराव पाटील किन्हाळकर यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत मराठी अपडेट समुहाच्या, राजकीय क्षेत्रातील मराठी अपडेट युथ आयकॉन पुरस्काराने बंटी लांडगे यांना सन्मानीत करण्यात आले. राष्ट्रवादी पक्षाच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. पावसाळ्यामुळे गोदावरी नदीकाठावरील भागात पुरस्थिती निर्माण झाल्याने अनेकांचे संसार उघड्यावर आले होते. या पुर बाधितांच्या मदतीसाठी बंटी लांडगे मदतीसाठी धावून येत अन्नदान व धान्य किट वाटप केले आहेत. लॉकडाऊन काळात मास्क, सॅनिटायझर वाटप यासह रमजान ईदनिमित्त सर्व धर्मगुरूंना कार्यक्रम घेवून एकतेचा संदेश देत असतात. यावर्षी ईदनिमित्त मुस्लिम बांधवांना मिठाई व पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध देखाव्यासह लक्षवेधी अशी मिरवणूक त्यांच्या नेतृत्वखाली काढण्यात येते. अशा विविध कार्याची दखल घेत मराठी अपडेटच्या वतीने अभिजात मराठी उत्सव, राजकीय मान्यवरांचे काव्यवाचन हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम सोमवार (ता.३१) रोजी मिनी सह्याद्री सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष बंटी लांडगे यांना, राजकीय क्षेत्रातून मराठी अपडेट युथ आयकॉन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी माजी राज्यमंत्री माधवराव पाटील किन्हाळकर, काँग्रेसचे यशपाल भिंगे, वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारुक अहमद, भाजपा प्रवक्ते संतोष पांडागळे, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, काँग्रेस प्रदेश सचिव सुरेंद्र घोडसकर, संजय शेळगावकर, काँग्रेस कार्याध्यक्ष महेश देशमुख तरोडेकर, काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल पावडे, कार्यक्रमाचे आयोजक, काँग्रेस प्रवक्ते तथा मराठी अपडेटचे संस्थापक बापूसाहेब पाटील आदीजन उपस्थित होते. या यशाबद्दल बंटी लांडगे यांचे विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.



### जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड**-नांदेड जिल्ह्यात २ एप्रिल सकाळी ६ वाजेपासून ते १६ एप्रिलच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २ एप्रिल सकाळी ६ वाजेपासून ते १६ एप्रिल २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

# भीम जयंती डीजे मुक्त करण्याचे सपोनि पांडुरंग माने यांचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**सोनखेड, दि.०४ एप्रिल**

नांदेड दक्षिण अंतर्गत, लोहा तालुक्यातील सोनखेड सर्कलमध्ये तसेच सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व गावांच्या भीम जयंती मंडळाच्या अध्यक्षांची आणि पोलिस पाटलांची सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस ठाणे सोनखेड येथे बैठक संपन्न झाली.

सविस्तर माहिती अशी की या महिन्यामध्ये विविध धार्मिक उत्सव असल्यामुळें गावातील बंधुभाव आणि समता अबाधित राहावी. या उद्देशाने सोनखेड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री पांडुरंग माने यांनी शांतता बैठक बोलावली होती.

यावेळी माने म्हणाले की, या वेळची भीम जयंती गावोगावी डीजे मुक्त व्हावी, यासाठी सर्व भीम जयंती मंडळाच्या कार्यकारिणींनी सहकार्य करावे. यावर आपल्या काय प्रतिक्रिया असतील तर त्या सांगाव्यात? तेव्हा जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी डीजे हा असायलाच पाहिजे. याविषयी आपली मत मांडली. आणि डीजेचा आवाज हा कमी प्रमाणात राहील. याची आम्ही काळजी घेण्याचा प्रयत्न करू, असे सांगितले. तसेच दुसरा मुद्दा म्हणजे प्रत्येक गावामध्ये सामाजिक सलोखा आणि बंधुभाव राहील या संदर्भाने मार्गदर्शन केले. याविषयी सर्व जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी समती दर्शवली. आणि विद्युत विभागाविषयीचा मुद्दा पोलीस पाटलांसाठी मांडला आणि काळजी घेण्याचे सांगितले.

यावेळी परिसरातील सर्व पोलिस पाटील तसेच परिसरातील भिमजयंती मंडळाचे अध्यक्ष व कार्यकारिणीचे प्रतिनिधी उपस्थित होते जवळा समता सैनिक दलाचे गुणवंत गच्चे, आकाशवाणी प्रासंगिक निवेदक तथा भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संरक्षण सचिव आनंद पुरभाजी गोडबोले यांच्या सह मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या आश्वासने जिवंत समाधी आंदोलन मागे

**तभा वृतसेवा**
**देगलुर, दि.०४ एप्रिल**

तालुक्यातील हाळी येथील शिवारात मागील काही दिवसांपासून हे उपोषण चालू होते. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, खरीप व रब्बी गावातील पीकविमा त्वरित देण्यात यावा, हाळी ते बेंबरा वंरा रस्त्याची तत्काळ दुरुस्ती करण्यात यावी, यासह इतर मागण्यांसाठी हाळी येथील शेतकरी शंकर पाटील जाधव यांनी स्वतः च्या शेतात दि.३० मार्चपासून आंदोलन सुरू केले होते. गुरुवार (ता. तीन) पर्यंत शासनाने या मागण्या मान्य केल्या नाही, तर स्वतःच्या शेतात जिवंत समाधी घेऊ, असा इशारा आंदोलक शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिला होता तसेच जिवंत समाधीसाठी शेतात खड्डा ही खोदला होता.

प्रशासन व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करीत आंदोलक शेतकऱ्यांसह गावकऱ्यांनी आक्रमक होत जिवंत समाधी घेण्याच्या तयारीत होते. प्रशासनाला ही चाहूल लागतात तहसीलदार भरत सूर्यवंशी व खासदार रवींद्र चव्हाण यांचे प्रतिनिधी म्हणून श्रीनिवास



पाटील चव्हाण यांनी थेट हाळी शिवार गाठला. आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांचा शासन दरबारी पाठपुरावा करण्याचे आश्वासन देत आंदोलन मागे घेण्याबाबत विनंती केली. मात्र, ते ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते.

अखेर जिल्हाधिकारी अरुण कर्डिले यांनी थेट आंदोलक शंकर पाटील जाधव यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधत आपल्या मागण्या शासनाकडे कळविण्यात आल्या असून, यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात लवकरच बैठक घेऊन त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. उपस्थित लोकप्रतिनिधी व गावकऱ्यांनी आंदोलनकर्त्याची समजूत काढत त्यांना आंदोलनापासून परावृत्त केले. आंदोलक शंकर पाटील यांनी हे आंदोलन काही काळापुरते स्थगित करीत असल्याचे यावेळी जाहीर केले. यावेळी माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरसेटवार, डॉ. विजयकुमार धुमाळे, डॉ. मिलिंद शिकारे, उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, प्रा. उत्तमकुमार कांबळे, कैलास येसगे, बालाजी थडके, शरीफ मामू, रमेश शिवनीकर, श्वेताताई पाटील, जयपाल कांबळे, सय्यद गुरुजी लोणे गुरुजी, सुभाष भोसले, लचनकर जाधव, सिकंदर देसाई, सचिन पाटील किनीकर, संदीप इबितवार यांच्यासह इतर कार्यकर्त्यांची यावेळी उपस्थिती होती. आंदोलनादरम्यान अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मरखेलचे सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र हुडेकर, जमादार अब्दुल बारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# नांदेड शहरातील मोर्चे-रॅलीच्या मार्गात बदल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०४ एप्रिल**

शहरात होणाऱ्या रॅली-मोर्चेच्या मार्गात जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५, ११६, ११७ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ मधील तरतुदीनुसार बदल केला आहे.

रॅली, मोर्चे इत्यादीसाठी महात्मा फुले चौक ते अण्णाभाऊ साठे चौक - हिंगोलीगेट ओव्हरब्रिज- गुरुगोविंदसिंघजी म्युझियमची उजवी बाजू- गर्ल्स हायस्कूल- जिल्हा न्यायालयाचे पाठीमागील बाजूने- शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय हा पर्यायी मार्ग राहील. नांदेड शहरातील रॅली, मोर्चे इत्यादीसाठी प्रतिबंधीत करण्यात आलेला मार्ग महात्मा फुले पुतळा, आय.टी.आय. चौक- फुले मार्केट चौक - कुसुमताई चौक-एस.टी.ओव्हरब्रिज - कलामंदीर- वजिराबाद चौक- शिवाजी महाराज पुतळा हा आहे.





**नांदेड-ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे रामेश्वर शिवराम नव्हेकर, महेश साहेबराव तोडे, किशन गोविंद पुलेवार, आकाश रमेश पैठणे यांना अटक केली असून त्यांच्याकडून दहा दुचाकी जप्त करण्यात आले आहेत. दुचाकी चोरी प्रकरणी नांदेड ग्रामीण, वजिराबाद, भाग्यनगर, सोनखेड, हिंगोली, परभणी, चतुःश्रृगी आदी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.**

# रावी जि.प. शाळेत पक्ष्यांसाठी पाण्याची सोय

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि.०४ एप्रिल**

सरली सुरेख थंडी, फोफावला उन्हाळा, संतप्त सूर्य आता, ओकेले तप्त ज्वाळा, पक्षी दाही दिशांना, फिरतील ते थव्यांनी, सुकतील कंठ त्यांचे, मग शोधतील पाणी, सुकली तळी जळाची, पाणी पिण्यास नाही, त्या सानुल्या जीवांची, होईल लाहीलाही , त्यांच्या जीवा करिता, इतकी कराच सेवा, वाटीत एवढेसे,पाणी भरून ठेवा.

उन्हाळा सुरू झाला आणि सूर्य आग ओकु लागला की आठवण होते त्या इवल्याशा पक्षांची. माणसाप्रमाणेच पक्षांनाही तहान लागते हे ओळखून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जि.प.प्रा.



शा. रावी येथील मुख्याध्यापक मारमवार सर यांच्या कल्पकतेने पक्षांना पाण्याची सोय करण्यात आली आहे. शाळेची शोभा वाढवणाऱ्या झाडांवर अनेक पक्षी घरटी करून राहतात, त्यांच्या पाण्याची सोय करण्यासाठी मारमवार सर यांनी प्लास्टिकचे टोपले झाडांना बांधून त्यात पक्ष्यांसाठी पाणी ठेवण्याची सुविधा केली.मुलांना निसर्ग व पर्यावरणाचे महत्त्व पटावे, पर्यावरणातील सर्व घटक कसे महत्त्वाचे आहेत हे माहीत करून द्यावे यासाठी रावी शाळा असे पर्यावरण पूरक उपक्रम हाती घेत असते. शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद,राम कोये( शा.व्य. स. सदस्य) आणि मुलांनी मिळून पक्ष्यांना पाण्याची सोय करून दिली. आहे

# मुलीच्या खुन्याला तात्काळ अटक करा

### आईचा प्राण त्याग करण्याचा इशारा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०४ एप्रिल**

देगलूर तालुक्यातील नवीन शेवाळा येथील विवाहिता मुलीचा सासरच्या आरोपींना तपास अधिकारी जाणीवपूर्वक अटक करत नसल्याने व फिर्यादीच्या नातेवाईकांवर दबाव निर्माण करण्यासाठी गुन्हे दाखल करत असल्याने त्रस्त होऊन मुलीच्या आईने मुख्य आरोपीला तात्काळ अटक करावी व तपास अधिकाऱ्याला निलंबित करून त्याच्या संपत्तीची चौकशी करण्याच्या मागणीसाठी गुरुवार दि. १० एप्रिल २०२५ नंतर प्राण त्याग करण्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे.

देगलूर तालुक्यातील नवीन शेवाळा येथील शिवकांता बालाजी बंडगर यांची मुलगी निकिता हिचा विवाह तमलूर येथील अरुण खांडेकर यांच्याशी झाला होता. सर्व काही सुरळीत चालू असताना निकिताचा पती अरुण व सासरच्या मंडळींनी खून केला याप्रकरणी गुन्हे रजिस्टर नंबर - ४६०/२०२४ प्रमाणे देगलूर पोलीस ठाणे येथे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक नरहरी फड यांच्याकडे देण्यात आला होता. परंतु तपास अधिकाऱ्यांनी खुनाचे आरोपी सासरा गोपाळ दिगंबर खांडेकर सासू पौर्णिमा यांना उशीराने अटक केली. परंतु मुख्य आरोपी पत्ती अरुण उर्फ रंजीत गोपाळ खांडेकर यास अटक केली नाही. विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयासमोर शिवकांता बंडगर यांनी आमरण उपोषण सुरू केले असता शहाजी उमाप यांनी सदर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला तरीही मुख्य आरोपी अरुण खांडेकर पोलिसांना कसा सापडत नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे? या खुनाचे तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक नरहरी फड व पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांनी फिर्यादीवर दबाव टाकण्यासाठी शिवकांता बंडगर यांचे बंधू शंकर चंदरराव खांडेकर यांचेवर पदाचा गैरवापर करून गुन्हे दाखल करीत आहेत.

# डॉ.बाबासाहेबांनी दिलेलं संविधान सर्वश्रेष्ठ : खा. रविंद्र चव्हाण

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.०४ एप्रिल**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेलं संविधान सर्वश्रेष्ठ असून जगातील विद्ववान लोक या संविधानाचा अभ्यास करतात भारतीय संविधान सर्वाना न्याय देणारे आहे. असे प्रतिपादन नांदेड लोकसभेचे खासदार प्रा.रविंद्र चव्हाण यांनी केले.

सोमवार दि.३१ मार्च२५ रोजी मौजे पाळज ता.भोकर येथील ग्रामस्थानी बसविलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे अनावरण पूज्य भंन्तेगण व खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते थाटात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा.प्रा.चव्हाण हे होते. पुतळा समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा शालपुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना खा.रवींद्र चव्हाण म्हणाले डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणजे ज्ञानाचे प्रतीक आहेत. त्यांच्या विद्वत्तेला जगात तोड नाही त्यांनी लिहिलेलं संविधान सर्वांना लोकशाही स्वातंत्र्य दिले. मनुवादी व्यवस्था लोकशाहीवर घाला घालत इथे राष्ट्रपुरुषांचा आवमान केल्या जातो मनुस्मृतीचे विचार प्रत्येक समाजासाठी घातक आहेत. संविधानाने सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य दिले बुद्धगया महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात दिलं पाहिजे असे सांगून बाबासाहेबाचा पुतळा उभारण्यासाठी पुढाकार घेतलेल्या पाळज ग्रामस्थांचे अभिनंदन केले. यानंतर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एल.ए.हिरे म्हणाले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत उच्च शिक्षण घेतले त्यांना छत्रपती शाहू राजे, बडोद्याचे राजे सयाजी गायकवाड यांनी मदत केली आता सोयीसुविधा असूनही बहुजनाची मुलं शिकत नाहीत हजारो जाती शेकडो धर्म अशा कठीण परिस्थितीत भारतीय संविधान लिहिले.बाबासाहेबांचे धर्मांतर गावकुसाबाहेरच्या समाजाला समतेच्या मार्गावर आणणारे होते. त्यांनी इतर धर्म स्वीकारला असता तर देशाची राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आली असती! महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यासाठी आंदोलन करणाऱ्या बौध्द भिख्खूवर लाटी चार्ज होतो हा अन्याय आहे. महाविहार मुक्तीसाठी खासदारांनी संसदेत आवाज उठवावा बाबासाहेबांचा पुतळा उभारण्यासाठी गावकरी, श्रीगणेश मंडळ संस्थानचे पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला पाळज गावचा आदर्श इतर गावच्या लोकांनी घेतला पाहिजे थोरसंत, राष्ट्रपुरुषाचे विचार समाजाला परिवर्तनाच्या दिशेने नेवू शकतात असे हिरे म्हणाले. पाळज येथील पुतळा अनावरण प्रसंगी मा.मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण व त्यांच्या कन्या आ.श्रीजया चव्हाण यांचे नाव जाहीर पत्रकात असुनही ते फिरकले नाहीत.विद्यमान खा.रविंद्र चव्हाण हे कार्यक्रमाचे अध्यक्ष असल्यामुळे खा.चव्हाण व त्यांच्या कन्या आ.श्रीजया उपस्थित राहु शकले नाहीत अशी चर्चा उपस्थित जनसमुदायात होत होती. यावेळी पप्पू पाटील कोंडेकर, गोविंद बाबा गौड, सुभाष पाटील किन्हाळकर, बाळासाहेब रावणगावकर, विजयालक्ष्मी किनीकर, भंन्ते पय्याबोधी, भंन्ते सत्यपाल, भंन्ते बुध्दभुषण, एम. सायलूदादा, गिरीधारी जंगमे, शंकर चंद्रे, सरपंच अंजनाबाई जाधव, उपसरपंच सुभाष चटलावार,गौतम कदम, संजय निवडंगे, भीमराव दुधाटे, दिलीप राव, श्री गणेश संस्थांनचे पध्दाधिकारी आदीसह अनेक मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणपत जाधव यांनी केले तर आभार लक्ष्मण डोंगरे यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुतळा समितीचे कार्यकर्ते परिश्रम घेतले रात्रीला टीव्ही स्टार फेम अंजली गडपाळे यांचा बुद्ध भीम गीताचा बहारदार कार्यक्रम झाला.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# गहाळ झालेले १३ मोबाईल केले परत

## संभाजीनगर पोलिसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ एप्रिल**

दि.४ : नागरिकांचे हरवलेले मोबाईल शोधण्याची उल्लेखनीय कामगिरी परळीतील संभाजीनगर पोलिसांनी केली आहे. नागरिकांकडून मोबाईल गहाळ झाल्याच्या तक्रारी आल्यानंतर पोलीस ठाण्याने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास केला. या तपासादरम्यान, १३ मोबाईल परत मिळवून त्यांच्या मूळ मालकांना शुक्रवारी (दि.४) सुपूर्द करण्यात आले.



संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने मोबाईल शोधकार्य सुरू केले. विविध मोबाईल कंपन्यांचे एकूण १३ मोबाईल, ज्यांची एकूण किंमत ३,२५,००० रुपये होती, ते परत मिळवण्यात यश आले. तक्रारदारांनी त्यांचे मोबाईल शोधून परत मिळाल्याबद्दल पोलीस प्रशासनाचे आभार मानले. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, पोलीस उपनिरीक्षक अनिल शिंदे, संभाजीनगर पोलीस ठाण्याचे टेक्निकल नालिसिसचे कामकाज पाहणारे पो.कॉ.व्यंकटी खाडे, बीडचे टेक्निकल नालिसिस सेलचे पो.कॉ.विकी सुरवसे यांनी मोलाची भूमिका बजावली. दरम्यान, १३ मोबाईल परत मिळवून त्यांच्या मूळ मालकांना शुक्रवारी (दि.४) सुपूर्द करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्यासह अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

गहाळ मोबाईल परत दिलेल्या तक्रारदारांची नावे

वसीम सलीम शेख, गणेश राजेभाऊ कोकीळ, कानिफनाथ साधू बनसोड, राधा देविदास कांबळे, तानाजी अंकुश मुळे, राजाराम लक्ष्मण गित्ते, उमाजी चंदू चव्हाण, दिनेश प्रभाकर दहिरे, राजेश पंकज गायकवाड, सचिन ईश्वर कागदे, गहिनीनाथ गुलाबराव शेप, बाबासाहेब सुर्यभान बळवंत सौदागर अंबाजी कांदे अशी गहाळ मोबाईल परत मिळालेल्या तक्रारांची नावे आहेत.

# आ.संदीप क्षीरसागरांच्या दूरदर्शी प्रयत्नाला यश

## बिंदुसरा नदीवरील पूल कम बंधार्याचा आ.क्षीरसागरांनी केला शुभारंभ
## बंधारा कम पुलामुळे बीड शहरासह परिसरातील गावांची भूजल पातळी वाढणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ एप्रिल**



बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या पात्रात पूल कम बंधारा बांधणीच्या कामाला अखेर सुरूवात झाली असून आ.संदीप क्षीरसागरांनी गुरूवारी (दि.३) रोजी या कामाचा शुभारंभ केला. आ.क्षीरसागर हे काम होण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. या कामाची सुरूवात झाली असून लवकरच हे काम पूर्ण होणार आहे. या पूल कम कोल्हापुरी पद्धतीच्या बंधार्यामुळे बीड शहर आणि परिसरातील आसपासच्या गावांमध्ये भूजल पातळीत मोठी वाढ होणार आहे. ही आनंदाची बाब आहे.

बीड शहरातील बार्शी नाक्याजवळील असलेल्या बिंदुसरा नदी पात्रात पूल कम कोल्हापूरी बंधारा तयार करावा. जेणेकरून बिंदुसरा नदीतून वाहून जाणारे पाणी अडविले जाईल. हे काम करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांनी गेल्या अनेक वर्षांपासून हा विषय लावून धरला. अशा स्वरुपातील हे काम असणार आहे. या कामाच्या मंजूरीसाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी अनेक वर्षे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. आणि अखेर आ.संदीप क्षीरसागरांच्या अथक प्रयत्नांना यश मिळाले आहे. बिंदुसरा नदीवरील बंधार्यामुळे बीड परिसरात सिंचन आणि पाणी उपलब्धतेसाठी मोठा फायदा होणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांतून बीडसाठी अतिशय फायदेशीर असलेले हे काम लवकरच पूर्ण होणार आहे.

पूल कम बंधार्याचा सिंचन आणि पाणी साठवण्यासाठी मोठा फायदा

शुभारंभ झालेल्या बिंदुसरा नदीवरील पूल कम कोल्हापूरी बंधार्यामुळे बीड शहर आणि आजूबाजूच्या साधारण ५ किलोमीटर पर्यंतच्या परिसरात भूजल पातळीत वाढ होणार आहे. बीड जिल्ह्यात पावसाची अनियमितता असल्याने प्रत्येक उन्हाळ्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होते. परंतु या कोल्हापूरी बंधार्यामुळे पाणी साठवणूक होईल. परिणामी पाणी उपलब्धता आणि शेती सिंचनासाठी याचा खूप मोठा फायदा या पूल कम बंधार्याचा होणार आहे. बिंदुसरा नदीवर बंधारा कम पूल ही संकल्पना मोठी दूरदर्शी होती. ती आ.संदीप क्षीरसागर यांनी डोळ्यासमोर ठेवून हे काम होण्यासाठी निरंतर प्रयत्न केले. शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. अनेकवेळा अधिवेशनातही हा मुद्दा मांडला. दरम्यान आता आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नांना यश आले असून लवकरच हे काम पूर्ण झालेले असेल.

# मस्साजोग सरपंच हत्या प्रकरण,आरोपींना सहकार्य करणाऱ्या पोलिसांच्या बदल्या करण्यात येतील – गृहराज्यमंत्री योगेश कदम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ एप्रिल**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपीना सहकार्य करणाऱ्या पोलिसांच्या बदल्या करा असे निर्देश गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिले. या प्रकरणात सहभाग सिद्ध झालेल्या कोणाचीही गय केली जाणार नाही असेही ते म्हणाले.

कदम यांनी आज मस्साजोग येथे भेट दिली. यावेळी त्यांनी कै. संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. कै. देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख तसेच मुलगी वैभवी देशमुख यांच्याशी चर्चा केली. सरकार या प्रकरणी खंबीरपणे देशमुख कुटूंबियांच्या पाठीशी आहे असे त्यांनी यावेळी सांगितले.

देशमुख कुटूंबियांचे सांत्वन केल्यानंतर श्री. कदम यांनी आतापर्यंत झालेल्या तपासाची माहिती घेतली.

बीड तरुंगात कैदेत असणारा या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याला अतिविशिष्ट दर्जा (ततखझ) प्रमाणे वागणूक तुरूंगातील अधिकारी देत आहेत असा आरोप सातत्याने होत आहे. याबाबत आपण मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करणार असून कराड आणि त्याच्या सहकारी अरोपीना इतर कारागृहात हलविण्याबाबत कार्यवाही संदर्भात बोलेन असे त्यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना सांगितले. उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या सांगण्यावरून मी आलो आहे. या अतिशय निर्गुण हत्याप्रकरणी कोणालाही सोडले जाणार नाही व आरोपीला फाशीच होईल या पद्धतीने आपण या प्रकरणाकडे पाहत आहोत असेही श्री कदम यावेळी म्हणाले.



बीड : यंदा वातावरण चांगले राहिल्याने झाडांना अशा कैऱ्या लगडल्या आहेत. (छाया : कृष्णा शिंदे)

## परशुराम संस्कार सेवा संघ महाराष्ट्र राज्य बीड जिल्हा वतीने ऋचा कुलकर्णी यांचा सत्कार




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ एप्रिल**

महाराष्ट्र राज्यातून न्यायाधीश परीक्षेत सर्व प्रथम आलेली बीड जिल्ह्याची कन्या कु. ऋचा विठ्ठलराव कुलकर्णी यांचा परशुराम संस्कार सेवा संघाच्यावतीने सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्याचे निमित्त साधून श्री महंत अमृत महाराज जोशी, परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅ.आशिष दामले, कालिदास नाना थिगळे, संपादक दिलीप खिस्ती, संस्थापक अध्यक्ष गजाननराव जोशी, प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब थिगळे, सौ.मंगलताई आगवान यांनी पुष्पहार आणि सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच तिला भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रमास परशुराम संस्कार सेवा संघाचे प्रदेश सचिव संजय कुलकर्णी, संपर्क प्रमुख बाबा पाठक, अमृताताई जोशी, सुषमाताई थिगळे, अर्चनाताई जोशी, विनोद रामदासी मराठवाडा अध्यक्ष विनायक देशमुख, जिल्हाध्यक्ष मुकुंद खडकीकर यांच्यासह परशुराम संस्कार संघाचे सर्व पदाधिकारी होते.

# परशुराम संस्कार सेवा संघाच्या वतीने सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा संप्पन




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ एप्रिल**

परशुराम संस्कार सेवा संघ महाराष्ट्र राज्य बीड मार्फत दर वर्षी सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन केले जाते. या वर्षी देखील परशुराम संस्कार सेवा संघा तर्फे दिनांक ०२ एप्रिल २०२५ बुधवार रोजी १०.५४ या अभिजित मुहूर्तावर साई पंढरी मंगल कार्यालय अंकुश नगर बीड या ठिकाणी मोठ्या थाटात संपन्न झाला. या मध्ये १२ बटूच्या सामुदायिक मुंजी आयोजित करण्यात आल्या होत्या. सदरील सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिषजी दामले उपस्थित होते. प्रथम पुरुष मान्यवरांचे स्वागत परशुराम संस्कार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष गजाननराव जोशी, प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब थिगळे, प्रदेश सचिव संजय कुलकर्णी, प्रदेश संपर्क प्रमुख बाबा पाठक, जिल्हाध्यक्ष मुकुंद खडकीकर यांनी केले. आणि महिला मान्यवरांचे स्वागत सौ.मंगलताई आगवान, सौ.अमृता जोशी, सौ.अर्चना जोशी, सौ.सुषमाताई थिगळे यांनी केले. महंत अमृत महाराज जोशी यांनी बटूंना आशीर्वाद दिले. कार्यक्रमास अ‍ॅड. कालिदासनाना थिगळे, शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल दादा जगताप, हेमंतभैय्या क्षीरसागर, प्रशांत सुलाखे, एकनाथ महाराज पुजारी, संपादक दिलीप खिस्ती, माजी नगरसेवक किशोर काळे, राजेंद्र काळे, परशुराम गुरखुदे, चंद्रकांतनाना मुळे, ब्राम्हण महासंघाचे प्रदेश अध्यक्ष निखिल लातूरकर, प्रदेश सचिव संजय सुपेकर, अभिजित बरिदे, बीड जिल्हा भाजप अध्यक्ष शंकर देशमुख, श्रीमती प्रज्ञाताई रामदासी, डॉ.सौ.सारिकाताई क्षीरसागर, संतोषराव लहाने आदी मान्यवर उपस्थित होते. सदरील सोहळा यशस्वी करण्यासाठी परशुराम संस्कार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष गजाननराव जोशी, प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब ठिगळे, प्रदेश सचिव संजय कुलकर्णी, प्रदेश संपर्क प्रमुख बाबा पाठक,मराठवाडा अध्यक्ष विनायक देशमुख जिल्हाध्यक्ष मुकुंद खडकीकर, विनोदराव रामदासी, भास्कर मुळे, रवींद्र कुलकर्णी, महेंद्र कुलकर्णी, शशिकांत पाटील, महिला मार्गदर्शक सौ.मंगलताई आगवान, महिला जिल्हाध्यक्षा सौ.अर्चनाताई जोशी, महिला प्रदेश सचिव सौ.अमृता जोशी, सौ.सुषमाताई थिगळे, सौ.वर्षा देशमुख आदींनी बहुमोल परिश्रम घेतले.

# जिजाऊंच्या वास्तवाने पावन झालेल्या भूमीमध्ये परळीच्या पत्रकाराचा सन्मान

## ज्येष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना वास्तववादी लिखाणासाठी पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.४ एप्रिल**

सिंदखेड राजा हे परगणा लखोजीराव जाधव यांच्या राजवाड्यासाठी प्रसिद्ध आहे. हा राजवाडा सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात जिजाबाईंचे वडील लखुजी जाधव यांनी बांधला होता . जिजाबाईंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी याच ठिकाणी झाला.

ख्यातनाम बहुजन साहित्य संघ, चिखलीच्या वतीने मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील राजे लखुजी जाधव साहित्य नगरी, येथे संपन्न झालेल्या साहित्य संमेलनात परळी येथील ज्येष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना त्यांच्या वास्तववादी व सामाजिक लिखाणा बद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला,राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थळावर प्रांत तथा जिल्ह्यातून आवर्जून उपस्थित झालेल्या साहित्यिक, कवी,आणि लेखक व रसिक माता भगिनींना सर्व मान्यवरांची मोठी उपस्थिती होती.

या साहित्य संमेलनात आपल्या वैविध्यपूर्ण लेखनाने वास्तववादी विषय मांडून सामाजिक जागृती करणारे परळी येथील जेष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना त्यांच्या लिखाणाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत असून विविध साहित्यिक, लेखक, पत्रकार यांनी त्यांना फोन करून तसेच प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या आहेत.

# अतिक्रमण मुक्त करून सरस्वती व घनशी नदीचे पुनर्जीवन करुन सुशोभीकरण करण्यात यावे : जुगलकिशोर लोहिया

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.४ एप्रिल**

पुरातन काळापासून प्रभु वैद्यनाथाचया पावन भुमीत असलेल्या व जुन्या गांव भागातुन वाहणाऱ्या सरस्वती व घनशी चे पुनर्जीवन करुन सुशोभीकरण करण्यात यावे व या नदीत झालेले अतिक्रमण काढून नद्यांचा श्वास मोकळा करण्यात यावा अशी मागणी नगर परिषदेचे मुख्याधिकारी व प्रशासक यांच्या कडे एका निवेदनाद्वारे मा.नगराध्यक्ष तथा भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया यांनी केली आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून नद्यांचे पुनर्जीवन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मोहीम राबविण्यात येत आहे . अधिकाधिक नद्यांचे पुनर्जीवन, खोलीकरण, सपाटीकरण पात्र विस्तारित करणे आदि बाबिंना प्राधान्यक्रम देण्यात येत आहे.जास्तीत जास्त नद्या उपनद्या, ओढे,नाले प्रवाही करण्यावर केंद्र व राज्य शासनाकडून भर दिला जात असताना परळीत नद्यांचे स्वरुप मात्र अतिक्रमणाच्या विळख्यात सापडत आहे.या बाबींवर प्रशासक व मुख्याधिकारी यांनी तातडीने कारवाई करावी व पुरातन काळापासून असलेल्या या दोन्ही नद्यांचे पुनर्जीवन करुन सुशोभीकरण करण्यात यावे अशी मागणी लोहिया यांनी केली असुन याबाबत लवकरच पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे,जिल्हाधिकारी, यांची भेट घेऊन निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती लोहिया यांनी दिली आहे.

## शिवाजीराव सुत्रावे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.४ एप्रिल**




येथील भावसार समाजाचे सामाजीक कार्यकर्त,रेडीमेड गारमेन्टचे सु प्रसिध्द व्यापारी श्री वैजीनाथराव सुत्रावे यांचे बंधु व पत्रकार द्वारकादास फटाले बीड याचें जावई कै. शिवाजीराव सुत्रावे यांचे दि.२ रोजी अल्पशा आजाराने दुखःद निधन झाले,गुरूवारी सकाळी १०वाजता परळी येथे त्यांचे पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.याप्रसंगी सर्वस्तरातील मंडळी ,व्यापारी पत्रकार,राजकिय, सामाजिक,क्षेत्रातील मंडळी आप्तेष्ट नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्याचेमागे आई,दोन भाऊ,पत्नी १मुलगा मुलगी व नातवंड असा परिवार आहे.

## पो.हे.कॉ.दत्तात्रय दुधाळ यांची सेवाज्येष्ठतेनुसार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ एप्रिल**

जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी शासन निर्णयातील तरतूदींनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाज्येष्ठतेनुसार पो.हे.कॉ.दत्तात्रय दुधाळ यांच्यासह ४ पो.हे.कॉ.यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती दिली आहे.



पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्तपदे सेवाज्येष्ठतेने भरण्याबाबत निर्देश दिलेले असुन त्यानुसार शासन निर्णयातील तरतूदींनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेले आहेत अशा ४ पो.हे.कॉ.यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी पदोन्नती दिली असुन यात शिरूर कासार पोलीस ठाण्याचे शिवाजी मुरलीधर चौधरी, जिल्हा वाहतूक शाखेचे दत्तात्रय भिमराव दुधाळ, अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या शालू रामभाऊ राऊत, राजेंद्र श्रीधरराव नन्नवरे यांचा समावेश आहे. जिल्हा पोलिस दलात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल दत्तात्रय दुधाळ यांचा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी पोलिस महासंचालक सन्मानचिन्हे देऊन २६ जानेवारी २०२५ रोजी गौरव केला. दत्तात्रय दुधाळ यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.